अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन / पावभाजी / पंजाबी डिशेस / छोले भटूरे / पावभाजी / मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०२.०९.२०२५ | अंक नं. १३१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

किमान 20% किंवा
जेवढ्या वजनाचा सोन्याचा दागिना..
तेवढी टक्के मजुरीत सूट..*
उत्सव मजुरीचा
ऑफर 27 ऑगस्ट ते 21 सप्टेंबर 2025 पर्यंत वैध
योजनेचा नियम : सोन्याचा प्रती एक दागिना व हजर स्टॉकवर लागू.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

## 'मराठा आरक्षणा'बाबतच्या मागण्या राज्य सरकारकडून मान्य, शासन निर्णय हाती पडताच मुंबई सोडणार : मनोज जरांगे पाटील

### हैदराबाद, सातारा गॅझेट लागू होणार, गावातील, कुळातील, नात्यातील व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र देणार; आंदोलकांचा जल्लोष सुरु



मुंबई - मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षण आंदोलनाबाबत केलेल्या मागण्या राज्य सरकारकडून मान्य करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये हैदराबाद गॅझेट लागू करण्यात येणार असून, त्यानुसार गावातील, नात्यातील, कुळातील लोकांना चौकशी करुन कुणबी प्रमाणपत्र देणार असल्याचे उपसमितीने मनोज जरांगे यांच्यासमोर मान्य केले आहे. तसेच सातारा गॅझेटच्या मागणीवर जलदगतीने निर्णय घेणार असल्याचेही उपसमितीने मान्य केले आहे. तसेच मराठा - कुणबी एकच असल्याचा शासन आदेश काढण्यासाठी २ महिन्यांची मुदत समितीने मागितली आहे. यावेळी झालेल्या चर्चेत हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेट लागू करण्याचे २ वेगळे आणि इतर मागण्यांचा आणखी एक असे ३ शासन आदेश काढले जाणार आहेत.

मराठा उपसमितीच्या शिफारशी - हैदराबाद गॅझेटची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मनोज जरांगे यांची मागणी होती. त्यास शासनाने मान्यता दिली आहे. गावातील, कुळातील, नात्यातील व्यक्तींना चौकशी करुन कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यात येईल. सातारा गॅझेटवर अभ्यास करून त्याला जलद मान्यता देण्यात येईल. मराठा आदोलकांवरील या आधीचे गुन्हे सप्टेंबर अखेर मागे घेण्यात येणार. मनोज जरांगे यांनी या मागण्या मान्य केल्या तर त्यासंबंधी तातडीने जीआर काढतो आणि त्याची अंमलबजावणी करतो, असा शब्द मराठा उपसमितीने दिला. मराठा आरक्षण आंदोलनात बळी गेलेल्या आंदोलकांच्या वारसांना तात्काळ आर्थिक मदत आणि राज्य सरकारी नोकरी देण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले.

मनोज जरांगे यांच्या आंदोलन थांबवण्यासाठी राज्य सरकारकडून प्रयत्न सुरू असून पहिल्यांदाच मराठा उपसमिती जरांगेंच्या भेटीला आझाद मैदानात गेली होती. मराठा आरक्षणावर सरकारच्या समितीने अंतिम मसुदा तयार केला असून त्यावर जरांगे यांच्यासोबत चर्चा करण्यात आली. मराठा उपसमितीने मनोज जरांगे यांची भेट घेतली आणि मसुद्यामध्ये काय तरतूद केली आहे, याची माहिती दिली. मराठा उपसमितीमध्ये अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री शिवेंद्रराजे भोसले, मंत्री माणिकराव कोकाटे, उद्योगमंत्री उदय सावंत यांचा समावेश होता.

या आधी शिंदे समितीचे प्रमुख न्यायमूर्ती शिंदे यांनी मनोज जरांगे यांची भेट घेतली आणि त्यांच्याशी चर्चा केली. शिंदे समितीने आतापर्यंत काय काम केले, याची माहिती त्यांनी दिली. शिंदे समितीने नंतर यासंदर्भात मराठा उपसमितीशी चर्चा केली. त्यानंतर मराठा उपसमितीने मराठा आरक्षणाचा अंतिम मसुदा तयार केला आणि तो जरांगे यांना दिला. मसुद्याबाबत तात्काळ शासन आदेश काढा, अशी मागणी जरांगे यांनी समितीकडे केली आहे. याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन विखे पाटील यांनी दिले.

## १८ टन पाण्याचे बॉक्स असलेल्या कंटेनरची महामार्गावरून चोरी

### पोलिसांनी पाठलाग करत रांजणगाव गणपती जवळ आरोपीला ठोकल्या बेड्या

नगर - नगर - पुणे महामार्गावर हॉटेलसमोर रात्रीच्या उभा केलेला सुमारे १८ टन पाण्याच्या बाटल्यांचे बॉक्स असलेला कंटेनर एकाने चोरून नेला. ही माहिती मिळताच पोलिसांनी थरारक पाठलाग करत रांजणगाव गणपती शिवारात असलेल्या खंडाळा माथा येथे पकडला असून कंटेनर चोरून नेणाऱ्या आरोपीला अटक केली आहे. १ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास ही घटना घडली आहे.

याबाबत कंटेनर चालक वैजिनाथ मारुती करे (वय २१, रा, इसाद, ता.गंगाखेड, जि.परभणी) यांनी सुपा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. करे हे भिवंडी येथील लॉजिस्टीक ट्रान्सपोर्ट मध्ये चालक म्हणून काम करतात, त्यांनी कंपनीचा कंटेनर (क्र.एमएच ०४ एल क्यु ८१२९) घेवून सुपा एमआयडीसी येथे आले होते. तेथे एका कंपनीतून १८ टन पाण्याच्या बाटल्यांचे बॉक्स कंटेनर मध्ये भरून ते मुंबईच्या दिशेने निघाले. जातेगाव फाट्याजवळ असलेल्या प्रवीण हॉटेल समोर १ सप्टेंबर रोजी पहाटे १ च्या सुमारास ते आणि त्यांना सहकारी कंटेनर रस्त्याच्या कडेला थांबवून चहा पिण्यासाठी गेले असता एका आरोपीने कंटेनर मध्ये बसून तो पळवला.

चालक करे यांनी तातडीने सुपा एमआयडीसीतील कंपनीच्या व्यवस्थापकाला फोन करून माहिती दिली. त्यांनी ही माहिती व कंटेनर चे वर्णन सुपा पोलिसांना सांगितले. त्यावेळी रात्रगस्तीवर असलेले पोलिस अंमलदार रमेश दरेकर व गिरवले यांनी पुण्याच्या दिशेने गेलेल्या कंटेनरचा पाठलाग सुरु केला. रांजणगाव गणपती शिवारात असलेल्या खंडाळा माथा परिसरात तो कंटेनर अडविण्यात आला आणि कंटेनर पळविणारा शिवम शंकर काळे (वय २१, रा. शिक्षक कॉलनी, पाटोदा, जि.बीड, हल्ली रा. चाकण, पुणे) याला पकडले. यावेळी त्याच्याकडे धारदार हत्यारेही आढळून आली असून पोलिसांनी ती जप्त करत त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करत त्याला अटक केली आहे.

पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक सुनिल कुटे हे करत आहेत.

## कापसावरील आयात शुल्कमाफी वाढविण्याच्या निर्णयाविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ३ सप्टेंबरला अधिसूचनेच्या प्रती जाळून आंदोलन

नगर - केंद्र सरकारने कापसावरील आयात शुल्क माफीचा कालावधी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतल्याने देशभरातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. या निर्णयाविरोधात ३ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अधिसूचनेच्या प्रती जाळून तीव्र आंदोलन छेडले जाणार आहे. अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने जिल्हाध्यक्ष कॉ. बबनराव सालके व सचिव कॉ. अप्पासाहेब वाबळे यांनी शेतकऱ्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

किसान सभेच्या नेत्यांनी सांगितले की, कापूस उत्पादक पट्ट्यातील शेतकरी विरोध करत असतानाही अर्थ मंत्रालयाने शुल्क माफी वाढवली. या निर्णयामुळे ऑक्टोबर २०२५ पासून सुरू होणाऱ्या कापूस हंगामात आयात केलेल्या कापसामुळे देशांतर्गत दर घसरतील आणि शेतकऱ्यांना योग्य दर मिळणार नाही. गेल्या ११ वर्षांत कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सीसीआय) ने देशांतर्गत उत्पादनातील केवळ १३ टक्के खरेदी केली असून, ८७ टक्के शेतकरी खुले बाजारात तोट्यात कापूस विकण्यास मजबूर आहेत.

नेत्यांच्या मते, मोदी सरकार अमेरिकेच्या दबावाखाली काम करत असून, औद्योगिक मक्तेदार घराण्यांच्या फायद्यासाठी शेतकऱ्यांचे नुकसान करत आहे. संयुक्त किसान मोर्चाने हा निर्णय शेतकरी समाजाचा अपमान असल्याचे सांगत देशभरात आंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे.

किसान सभेच्या अहवालानुसार, २०२४ मध्ये भारतातील कापड उद्योगाचा आकार तब्बल १५,१३,८५० कोटी रुपये इतका होता. त्यातील १२,३४,४०० कोटी रुपयांचा हिस्सा देशांतर्गत बाजाराचा होता, तर निर्यात बाजार केवळ ३,२१,९०० कोटी रुपयांचा होता. त्यातही अमेरिकेला जाणारी निर्यात फक्त २०,९८४ कोटी रुपये (१.५% पेक्षा कमी) इतकी आहे. त्यामुळे निर्यात संकट हा केवळ बहाणा असून, मक्तेदार व्यापाऱ्यांना स्वस्त आयात करून लाभ मिळवून देणे हा खरा हेतू आहे, असा आरोप करण्यात आला.

फायदेशीर किमान आधारभूत किंमत (एमएसपी) सी२+५०% प्रमाणे न दिल्याने देशातील तब्बल ६० लाख कापूस शेतकऱ्यांचे सुमारे १८,८५० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना एमएसपी आणि कामगारांना किमान वेतन हमी दिल्यास देशांतर्गत क्रयशक्ती वाढेल आणि त्यामुळे निर्यात संकटावर मात करता येईल. तसेच हातमाग, यंत्रमाग आणि उद्योगांना स्वस्त कापूस पुरवून देशांतर्गत व्यापार वाढवणे गरजेचे असल्याचे सांगण्यात आले आहे.

या आंदोलनासाठी कॉ. बन्सी सातपुते, प्रा. सुभाष ठुबे, कॉ. लक्ष्मण नवले, बापुराव राशिनकर, सुरेश पानसरे, सुनिल दुधाडे, भारत अरगडे, बाबासाहेब सोनपुरे, बबनराव पवार, मेमाणे सर, प्रताप सहाणे, ॲड. सुधीर टोकेकर, संदीप इथापे, गोरक्ष मोरे, पांडुरंग शिंदे, सुलाबाई आदमने, लता मेंगाळ, रमेश नागवडे आदींनी शेतकऱ्यांना या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## नगर जिल्ह्यात ४ सप्टेंबरपर्यंत 'यलो अलर्ट'

नगर - भारतीय हवामान खात्याने २ ते ४ सप्टेंबर या कालावधीत जिल्ह्यात वीजांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस व तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा वाहण्याचा अंदाज वर्तविला आहे. जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला असून नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

पुणे, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यांत मध्यम ते मुसळधार पाऊस झाल्यास भिमा, प्रवरा, गोदावरी, घोड, सीना तसेच मुळा धरणातून होणाऱ्या विसर्गामुळे नद्यांची पाणीपातळी वाढू शकते. मुळा नदीपात्रातील कोतूळ येथून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने नदीकाठावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांना पुढील दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे

मेघगर्जना, वीजा किंवा वादळी वाऱ्याच्या वेळी झाडाखाली किंवा त्याजवळ थांबू नये, सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा.

वादळादरम्यान विद्युत उपकरणे वापरू नयेत व वीजेच्या सुवाहक भागांपासून दूर राहावे.

मोकळे मैदान, टॉवर, विद्युत खांब, धातूची कुंपणे, लटकणाऱ्या केबल्स यांपासून दूर राहावे.

जाहिरात फलकांच्या आसपास थांबू नये.

मोकळ्या जागी असल्यास गुडघ्यावर बसून डोके व कान झाकावे.

धरण व नदी परिसरात पर्यटनासाठी जाऊ नये, पाण्यात उतरू नये व धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये.

नदी, ओढा, नाले काठावरील नागरिकांनी पाणीपातळी वाढल्यास त्वरित सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे, पाण्यावरून वाहणारे पूल ओलांडू नयेत.

मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये थांबू नये.

अतिवृष्टीमुळे भूस्खलनाची शक्यता असल्याने डोंगरपायथ्याशी राहणाऱ्यांनी वेळीच स्थलांतर करावे, घाटरस्त्याने प्रवास टाळावा.

शेतीमाल व जनावरांचे संरक्षण करण्यासाठी योग्य नियोजन करावे. आपत्कालीन परिस्थितीत नजीकच्या पोलीस ठाणे किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा. जिल्हा नियंत्रण कक्ष - दूरध्वनी क्रमांक १०७७ (टोल फ्री), ०२४१-२३२३८४४, २३५६९४० उपलब्ध आहेत.

आठवे पुण्यस्मरण

आठवण तुमची प्रत्येक क्षणाला, व्याकुळ करते आमच्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आमच्यात, सदैव राहतील तुमच्या
आठवणी आमच्या मनात..



कै.अजय रावसाहेब बोरुडे
स्व.दि.२/९/२०१७
दुःखांकित
समस्त बोरुडे परिवार

विना ऑपरेशन शिबीर
* वघळलेले कान मिनिटांतच चिटकवा
* विना ऑपरेशन रामबाण उपाय
* डोळा- मोतीबिंदू, लासुर ड्रॉपने घालवा
* नाक- खोकला, सर्दिसाठी Asclepius
* त्वचा- पिंपल्स,काळे डाग, व्रण, मोस काढणे, टॅटू पुसुन टाकणे, कपाळाचे गोंधण काढणे
* सगळे व्यसन सोडवा नशामुक्ती स्प्रे वापरा
* दारु, गुटखा,तंबाखु, बिडी-सिगारेट
हर्बल स्प्रे वापरा नशामुक्त व्हा...!
डॉ. मंजुषा -7507718246

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला तातडीने मदत द्यावी

### शासकीय जागेवरील अतिक्रमण नियमाकुल करण्यासंदर्भात शासन निर्णयाची अंमलबजावणी करा : जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर – कर्जाला कंटाळून आत्महत्या केलेल्या वडूले (ता. नेवासा) गावातील शेतकरी कुटुंब बाबासाहेब सुभाष सरोदे परिवारास तातडीने मदत द्यावी व शासकीय जागेवरील अतिक्रमण नियमाकुल करण्यासंदर्भात १ ऑगस्ट २०२५ रोजी निर्गमीत झालेल्या शासन निर्णयाचे जिल्हास्तरावर तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या मागणीचे निवेदन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे करण्यात आली आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांची भेट घेऊन सदर प्रश्नावर लक्ष वेधले. यावेळी राज्य महासचिव प्रा.किसन चव्हाण, जिल्हाध्यक्ष योगेश साठे, युवा शहर अध्यक्ष ॲड. योगेश गुंजाळ, जिल्हा महासचिव प्रसाद भिवसने, शहर उपाध्यक्ष प्रवीण ओरे, शहर महासचिव अमर निर्भवणे, भिंगार शहराध्यक्ष राजीव भिंगारदिवे, जे.डी. शिरसाठ, बाबासाहेब आल्हाट, गणेश राऊत, पोपट सरोदे, संकेत शिंदे, अजित कुऱ्हाडे, रियाज शेख, प्रतीक जाधव, फिरोज पठाण, अविनाश ठोंबरे, प्रसाद कांबळे, रवींद्र सरोदे, प्रसाद कांबळे, शंकरराव भारस्कर आदी उपस्थित होते.


आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला तातडीने मदत देवून शासकीय जागेवरील अतिक्रमण नियमाकुल करण्यासंदर्भात शासन निर्णयाची अंमलबजावणी करा, या मागणीचे निवेदन वंचित बहुजन आघाडीच्यावतीने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना देण्यात आले.

वडूले (ता. नेवासा) येथील शेतकरी बाबासाहेब सरोदे यांनी कर्जाला कंटाळून आत्महत्या केली. त्यांच्या मागे त्यांची पत्नी मुले, मुली व आई–वडिलांचा परिवार आहे. या परिवारावर दुःखाचा संकट कोसळला असून, त्यांची मुलगी किरण सरोदे ही विखे पाटील ॲग्रीकल्चर महाविद्यालय विळद घाट येथे बीएससी ॲग्री दुसऱ्या वर्षात शिकत असून, तिची शैक्षणिक हानी होत आहे. त्यामुळे हिचा शैक्षणिक खर्च सरकारी खर्चातून करण्यात यावा. तसेच त्यांची पत्नी अर्चना बाबासाहेब सरोदे यांचे शिक्षण एमएससी डीएड असल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी त्यांना शासकीय सेवेत रुजू करून घ्यावे. मयत सरोदे यांच्या कुटुंबीयांना तातडीने शासनाकडून आर्थिक मदत मिळण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच सर्वांसाठी घरे प्रधानमंत्री आवास योजना शासनाच्या इतर विभागातून महसूल विभागाकडे वर्ग करण्यात आलेली आहे. वापरात नसलेले पांदन रस्ते अथवा गावांतर्गत रस्ते तसेच रस्त्यांच्या सीमेमध्ये रस्त्यांचे रुंदी करणासाठी, विकासासाठी भविष्यात न लागणाऱ्या जमिनीवरील सार्वजनिक रस्त्यांचे हक्क महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम २१ नुसार निर्देशित करून घरकुलासाठीची अतिक्रमणे तात्काळ नियमित करण्यात यावी, असे महाराष्ट्र शासनाचे महसूल व वन विभाग यांनी विषय दोन अन्वये शासन निर्णय १ ऑगस्ट २०२५ रोजी जाहीर केलेला आहे.

या शासन निर्णयाचे जिल्हास्तरावर तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निवेदनात म्हटले आहे.

## महामार्गावरील उभ्या वाहनातून डिझेलची चोरी

नगर – नगर मनमाड महामार्गावर विळद (ता.नगर) शिवारात असलेल्या प्रियंका रिसॉर्ट समोर रस्त्याच्या कडेला उभ्या केलेल्या वाहनातून १२ हजार ५०० रुपये किंमतीचे २५० लिटर डिझेल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १ सप्टेंबर रोजी पहाटे १.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत याकुब गुलमोहम्मद मन्सुरी (रा. सेंधवा, मध्य प्रदेश) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांनी रात्र झाली आणि झोप येवू लागल्याने त्यांचे वाहन प्रियंका रिसॉर्ट समोर रस्त्याच्या कडेला उभे केलेले होते. त्यावेळी अज्ञात चोरट्याने वाहनाच्या डिझेल टाकीतून १२ हजार ५०० रुपये किंमतीचे २५० लिटर डिझेल चोरून नेल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## बुऱ्हाणनगर परिसरामध्ये मारहाण करत धमकावले; ४ जणांविरुद्ध गुन्हे दाखल

नगर – नगर शहराजवळील बुऱ्हाणनगर परिसरात १ सप्टेंबर रोजी दोन वेगवेगळ्या घटनांत जुन्या वैमनस्यातून दोन तरुणांना मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात २ स्वतंत्र गुन्हे दाखल झाले आहेत.

पहिल्या घटनेत, अभिषेक गोरख धाडगे (वय २०, रा. धाडगेमळा, कापुरवाडी) याने फिर्याद दिली की, दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास बुऱ्हाणनगर येथील आनिल टेलरच्या दुकानाजवळील चौकातून मोटारसायकलवर जात असताना ओंकार कैलास शेलार आणि सिद्धार्थ चंद्रकांत महेत्रे (दोघे रा. देवी मंदिराजवळ, बुऱ्हाणनगर) यांनी त्याला थांबवले. जुन्या वादाच्या कारणावरून त्यांनी अभिषेक याला लाथा–बुक्क्यांनी मारहाण करून नादी लागशील तर जीवे मारू अशी धमकी दिली.

दुसऱ्या घटनेत, सलमान रफिक शेख (वय २५, रा. कापुरवाडी) याने फिर्याद दिली की, सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास बुऱ्हाणनगर रोडवरील गुगळे फार्म जवळ मोटारसायकलवर जात असताना गालीब खान आणि रेहान खान (दोघे रा. देवी मंदिराजवळ, बुऱ्हाणनगर) यांनी त्याला थांबवले. तू माझ्याकडे नेहमी खुन्नसने का पाहतो? असे म्हणत त्यांनी सलमान याला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. दोन्ही फिर्यादींनी कॅम्प पोलीस स्टेशन भिंगार येथे तक्रार नोंदवली. या प्रकरणी पोलिसांनी चौघांच्या विरुद्ध बीएनएस २०२३ चे कलम ११५ (२),३५१(२)(३),३५२ प्रमाणे गुन्हे दाखल केले आहेत.

## रिपब्लिकनचे जिल्हाध्यक्ष यांच्यावर हल्ला केलेल्या आरोपींवर 'मोक्का' लावून सुनील साळवे कुटुंबियास पोलीस संरक्षण द्या

नगर – रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) तर्फे जिल्हा अध्यक्ष सुनील साळवे यांच्या कुटुंबीयांवर झालेल्या हल्ल्याचा निषेध करून आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याची तसेच साळवे कुटुंबीयांना पोलीस संरक्षण देण्याची मागणी करण्यात आली. या मागण्यांसाठी आरपीआयच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन सादर केले. या मोर्चामध्ये राज्य उपाध्यक्ष विजय वाकचौरे, जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत भालेराव, शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, उत्तर महाराष्ट्र सचिव अजयराव साळवे, उत्तर जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, राज्य उपाध्यक्ष दीपकराव गायकवाड, अमित काळे, विभागीय अध्यक्ष भीमा बागुल, जिल्हा कार्याध्यक्ष लॉरेन्स स्वामी, नगर तालुकाध्यक्ष अविनाश भोसले, राजू बडे, राजू जगताप, बाबा राजगुरू, आदिनाथ भोसले, विजय भांबळ, संजय कांबळे, ज्योती पवार, आरतीताई बडेकर, युवराज गायकवाड, पप्पू बनसोडे, राजू नाना गायकवाड, सतीश मगर, धनंजय निकाळे, विजयराव खरात, कैलास कासार, अनिल नलावडे, विवेक भिंगारदिवे, विलास साळवे, सुरेश भागवत, प्रदीप लोखंडे, गौरव मगर, अमोल आहेर, राकेश गरुड, महेश अंगारखे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.


रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष यांच्यावर हल्ला केलेल्या आरोपींवर मोक्का लावून सुनील साळवे कुटुंबाला पोलीस संरक्षण द्यावे या मागणीसाठी पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन देण्यात आले.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, जामखेड तालुक्यातील नान्नज गावामध्ये गुंडांची टोळी कार्यरत असून, गावात दहशत निर्माण करणे, नागरिकांना मारहाण करणे, दुकानदार व वाहनचालकांकडून खंडणी उकळणे, व याच टोळीतील गुंडांनी २९ जून रोजी अल्पवयीन विद्यार्थिनी वर अत्याचार केला होता त्यावेळेस साळवे यांनी गाव बंद केले होते याचाच राग मनात धरून साळवे यांच्या कुटुंबीयांवर तलवार, कोयते, लोखंडी रॉडसह जीवघेणा हल्ला करण्यात आला. यामध्ये यशदीप साळवे, रतन साळवे, आदेश साळवे, रेश्मा साळवे यांना गंभीर जखमी करून दिग्विजय सोनवणे यांना देखील जखमी करण्यात आले आहे. अभिजीत साळवे यांच्यावर १५–१६ वार करून त्यांना बेशुद्ध पडेतोवर मारहाण करण्यात आली. या प्रकरणातील आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करून घटनेचा सूत्रधार कोण याचा शोध घ्यावा, कलम १२० (ब) लावावे, आरोपींच्या कॉल डिटेल्स तपासून चौकशी करावी, केस फास्टट्रॅक कोर्टात चालवावी व सर्व आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. काही आरोपी अटकेत असले तरी अनेक अजूनही मोकाट फिरत आहेत. आरपीआयच्या निवेदनात सुनील साळवे व त्यांच्या कुटुंबीयांना पोलीस संरक्षण द्यावे व तपासात कोणताही हलगर्जीपणा झाल्यास पक्षाकडून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थिनीची गळफास घेत आत्महत्या; तरुणाविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल

नगर – तरुणाने वारंवार फोन करून त्रास दिल्याने तसेच पैशांची मागणी केल्याने या त्रासाला कंटाळून नर्सिंग कॉलेजच्या २१ वर्षीय विद्यार्थिनीने आपल्या रूम मध्ये गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना भाळवणी (ता.पारनेर) येथे घडली आहे. रोशनी अरुण तेलगुटे (रा. गाडगेनगर, मुर्तीजापूर, जि. अकोला) असे मयत तरुणीचे नाव असून तिला त्रास देणारा हर्षदीप ताटके (रा. चिखली, ता. मुर्तीजापूर, जि. अकोला) याच्या विरुद्ध पारनेर पोलिस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मयत रोशनी हिचे वडील अरुण गंगाराम तेलगुटे (वय ५७, रा. गाडगेनगर, मुर्तीजापूर, जि. अकोला) यांनी ३१ ऑगस्ट रोजी पारनेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची मयत मुलगी रोशनी ही सन २०२३ पासून विजया स्कुल ऑफ नर्सिंग कॉलेज, भाळवणी, ता. पारनेर येथे नर्सिंग चे शिक्षण घेत होती. तिने २५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.५५ वाजण्याच्या सुमारास तिच्या वडिलांना फोन करून मला १५ हजार रुपये पाठवा असे म्हणाली, त्यावर त्यांनी पाठवतो असे सांगितले. त्यानंतर रात्री ७.०८ वाजण्याच्या सुमारास त्यांना भाळवणी वरून एकाने फोन करून तुमच्या मुलीने आत्महत्या केल्याचे सांगितले.

त्यामुळे फिर्यादी हे त्यांचा मुलगा व नातेवाईकांना घेवून तातडीने भाळवणीकडे निघाले. २६ ऑगस्ट रोजी पहाटे ४ वाजता ते तेथे पोहोचले, व त्यांनी मयत रोशनी हिच्या रूम मध्ये राहणाऱ्या तिच्या मैत्रिणींकडे विचारपूस केली असता त्यांनी रोशनी हिच्या सोबत हर्षदीप ताटके हा तरुण गेल्या १५ –२० दिवसांपासून भांडण करत होता, तिला पैशांची मागणी करत होता. तसेच तिचा फोन व्यस्त लागला म्हणून तिच्यावर संशय घेवून तिला त्रास देत होता. त्यामुळे ती खूप तणावात होती, अभ्यासही करत नव्हती अशी माहिती दिली. याच मुलाने रोशनी ही १० वी मध्ये शिकत असताना तिला त्रास दिला होता. त्यावेळी त्याच्या वडिलांना रोशनीच्या वडिलांनी समजावून सांगण्यास सांगितले होते. तरीही त्याने पुन्हा तिला त्रास देत आत्महत्येस प्रवृत्त केले असल्याची फिर्याद मयत रोशनीच्या वडिलांनी ३१ ऑगस्ट रोजी दिल्याने पोलिसांनी हर्षदीप ताटके याच्या विरुद्ध बीएनएस कलम १०८ नुसार आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

## वाकोडी परिसरातून १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर – एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची घटना नगर तालुक्यातील वाकोडी परिसरात घडली. यासंदर्भात मुलीच्या मामाने दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीची भाची हिला ३० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास गावातून कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेले. घटनेची माहिती फिर्यादीला मिळाल्यानंतर त्यांनी मुलीचा सर्वत्र शोध घेतला असता ती मिळून आली नाही. त्यानंतर त्यांनी १ सप्टेंबर रोजी सायंकाळी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

## रेखाबाई पोखर्णा यांचे अल्प आजाराने निधन

नगर – आगरकरमळा येथील रहिवासी सौ. रेखा महेंद्र पोखर्णा



(वय ६१) यांचे २ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रुपेश, प्रितेश, विकी यांच्या त्या मातोश्री होत तर रसिकलाल, सुरेशलाल गुंदेचा यांच्या पुतणी होत.

## भाऊसाहेब पाचपुते यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीगोंदा – श्रीगोंदा तालुका अपंग संघटनेचे माजी अध्यक्ष



भाऊसाहेब दिनकर पाचपुते (वय ८५) यांचे १ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर काष्टी येथे घोडनदी तिरी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावाई असा परिवार आहे. ते श्रीगोंदा काष्टी येथील साईनगर येथील स्वामी समर्थ इंजिनिअरींगचे मालक बाळासाहेब व नितीन पाचपुते यांचे वडील होत.

## श्रीमती हौसाबाई नलावडे यांचे निधन

आळंदी – येथील ज्येष्ठ नागरिक, आदर्श माता श्रीमती



हौसाबाई सोपानबुवा नलावडे यांचे अल्पशा आजाराने (वय ९३) निधन झाले. त्यांच्यामागे दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

वाशी नवी, मुंबई येथील फळांचे होलसेल व्यापारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, आळंदीतील वारकरी शिक्षण संस्थेचे खजिनदार भालचंद्र नलावडे, शैलेंद्र नलावडे हे मूळचे धोलवड तालुका जुन्नर येथील आहेत. आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेचे खजिनदार भालचंद्र नलावडे हे अनेक वर्षा पासून सामाजिक, धार्मिक, राजकीय अशा विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. हौसाबाई नलावडे या त्यांच्या मातोश्री होत.

## बोरुडे मळ्यात घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार जेरबंद

### दोन ठिकाणी घरफोड्यांची कबुली, १.१० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

नगर – बालिकाश्रम रस्त्यावरील बोरूडे मळा परिसरात झालेल्या घरफोडीचा गुन्हा अवघ्या ४८ तासांत उघडकीस आणत तोफखाना पोलिसांनी सराईत गुन्हेगाराला जेरबंद केले आहे. त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्या ताब्यातून १ लाख १० हजार रूपयांचा सोन्या–चांदीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

बोरूडे मळा परिसरातील अमृतकलश अपार्टमेंटमधील फ्लॅट क्रमांक १०२ मध्ये चोरट्यांनी २६ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट दरम्यान घरफोडी केली होती. फिर्यादी पवनेश बाळासाहेब चव्हाण हे कुटुंबासह गणेशोत्सवासाठी गावी गेले असता त्यांच्या घराचे कुलूप तोडून ५० हजार रूपये किमतीचे सोन्या–चांदीचे दागिने चोरीस गेले होते. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घरफोड्यांच्या तपासासाठी पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यातील हालचाली व गुन्ह्याची पध्दत लक्षात घेऊन संशयितांविषयी खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी वैभव ऊर्फ मुकेश किरण भोसले (रा. धानोरा, पिंपळखेड शिवार, ता. आष्टी, जि. बीड) याला अकोळनेर (ता.नगर) परिसरातून सापळा रचून ताब्यात घेतले. पोलिस चौकशीत संशयित आरोपीने तोफखाना पोलीस ठाणे हद्दीत दोन घरफोड्या केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून एका गुन्ह्यातील ४० हजार रूपये किमतीचे सोने व दुसर्या गुन्ह्यातील ७० हजार रूपये किमतीचे दागिने असा १ लाख १० हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याशिवाय, सदर संशयित आरोपी हा एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल दरोड्याच्या गुन्ह्यात पसार असल्याचे उघडकीस आले आहे.


बोरुडे मळ्यात २ ठिकाणी घरफोडी करणारा आरोपी पकडल्यानंतर त्याच्यासमवेत तोफखाना पोलिसांचे पथक.

ही कारवाई पोलिस निरीक्षक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर, पोलीस अंमलदार सुनील चव्हाण, नितीन उगलमुगले, योगेश चव्हाण, भानुदास खेडकर, सुधीर खाडे, सुरज वाबळे, सुमित गवळी, अविनाश बर्डे, सतीश त्रिभुवन, बाळासाहेब भापसे, भागवत बांगर, दादा रोहोकले, सुजय हिवाळे यांनी केली आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यात शेकडो शाळा मुख्याध्यापकांविना; रिक्त पदे त्वरित भरण्यात यावी अन्यथा आंदोलन करणार

### विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शिक्षकांना तातडीने पदोन्नती द्यावी

नगर – जिल्ह्यात शेकडो शाळा मुख्याध्यापकांविना चालत असून, यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे. गेल्या वर्षभरापासून मुख्याध्यापक पदावर कोणतीही पदोन्नती न झाल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) सामाजिक न्याय विभागाचे नगर तालुकाध्यक्ष चंद्रशेखर पंचमुख यांनी प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांना निवेदन देऊन तातडीने पदोन्नतीची मागणी केली.

पंचमुख यांनी स्पष्ट केले की, जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये सेवा ज्येष्ठ शिक्षकांकडेच वर्ग सांभाळून मुख्याध्यापकांचा अतिरिक्त कार्यभार दिला जातो. यामुळे शिक्षकांवर दुहेरी ताण पडत असून, अध्यापनाची गुणवत्ता कमी होत आहे. परिणामी विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे.


शाळांमधील रिक्त पदे त्वरित भरण्यात यावी, या मागणीचे निवेदन प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांना देताना चंद्रशेखर पंचमुख.

गेल्या वर्षभरापासून मुख्याध्यापक पदोन्नतीची प्रक्रिया लवकरच होईल, असा दावा शिक्षण विभागाने वारंवार केला होता. मात्र प्रत्यक्षात अद्याप नियुक्ती झालेली नाही. दरवेळी तालुकास्तरावरून माहिती मागवली जाते, याद्या प्रसिद्ध केल्या जातात, तरीही मुख्याध्यापकांच्या पदोन्नतीचा विषय रखडलेलाच आहे. पुणे आणि कोल्हापूर जिल्हा परिषदांमध्ये शिक्षकांना मुख्याध्यापक पदावर पदोन्नती दिली गेली असताना अहमदनगर जिल्हा परिषद मात्र मागे पडली आहे.

यंदाच्या २०२५ च्या बदली प्रक्रियेत फक्त दोनच मुख्याध्यापकांच्या बदल्या झाल्या आहेत. मग उर्वरित रिक्त जागांवर पदोन्नती का होत नाही? शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची पदोन्नती सहा महिन्यांत तीन वेळा केली जाते, मात्र शाळांना मुख्याध्यापक देण्यासाठी मात्र विलंब का? असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात आला.

पंचमुख यांनी शिक्षक दिन (५ सप्टेंबर)पर्यंत मुख्याध्यापक पदाच्या रिक्त जागांवर पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करावी. अन्यथा विद्यार्थ्यांच्या हितासाठी पुढील आंदोलनाचा विचार करावा लागेल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

अननसामध्ये मॅग्नेशियमचे प्रमाण जास्त असते. मॅग्नेशियम हाडे मजबूत करण्यासाठी मदत करते. या व्यतिरिक्त यामध्ये असलेले ब्रोमोलिन तत्त्व हाडांच्या आजारापासून आपले रक्षण करते. सांधेदुखीचा त्रास असणाऱ्या लोकांनी अननसाचे सेवन करावे. अननस हिवाळा आणि उन्हाळा दोन्ही ऋतूंमध्ये उपलब्ध असते. यामध्ये व्हिटामिन आणि प्रोटीनचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे अननस खाणे लाभदायक आहे.

१ लिटर पाण्यात लिंबाची साले विरघळेपर्यंत उकळावीत नंतर हे पाणी स्वच्छ वस्त्राने गाळावे. तेल लावल्यानंतर केसांना हे पाणी लावले तर केसांना चमक येते आणि मुलायमपणाही येतो.

## पाककला

### सुलतानी लस्सी

**साहित्य** – घट्ट दही ५०० मि. लि., साखर १०० ग्रॅम, बर्फ चुरा लागेल तसा, रोझ इसेन्स ४–५ थेंब, व्हॅनिला आईस्क्रीम १ स्कूप (वा अधिक), थोडे ड्रायफ्रुटस्.

**कृति** – साखर, इसेन्स, दही व बर्फाचा चुरा एकत्र करा व खूप जोरात घोटा. ड्रायफ्रुटस्चे बारीक तुकडे करा. प्रत्येक पेल्यात थोडे आईस्क्रीम घाला. त्यावर लस्सी ओता. त्यावर ड्रायफ्रुटस् पेरा. वाटल्यास थोडी टूटी–फ्रुटी वरुन टाका.

## वास्तू

* कार्यालयाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा कक्ष हा सर्वात प्रथम वा सुरुवातीला असू नये, प्रवेशद्वाराजवळ एखाद्या अशा सहायकाचे टेबल असावे, जो व्हिजिटर्सना माहिती देऊ शकेल.

* घर वा दुकानामध्ये वास्तूदोष असून, लक्ष्मीची अवकृपा रहात असेल तर रोज स्नानानंतर लक्ष्मीची प्रतिमा वा नोटांसमोर कनकधारा स्तोस्त्राचा पाठ करावा. लाभ अवश्य होईल.

* चीक निघणाऱ्या वनस्पतीही घरात लावणे अशुभ आहे. त्यामुळे कौटुंबिक जीवनात बेकी, दुही, मतभेद, कलह, विणतंडवाद वाढीस लागतात.

## सल्ला

बऱ्याचदा किचनमध्ये वास येऊ लागतो. यासाठी दोन कप पाण्यात अर्धा कप व्हिनेगर मिसळून उकळून घ्या व वास येत असलेल्या जागी ओता.

## सौंदर्य

* डोळ्याखालील काळी वर्तुळे असल्यास बदामाचे तेल व केळ्याचा कुस्करलेला गर एकत्र करुन नियमित लावावे.

* टोमॅटो आणि लिंबाचा रस तसेच दूध सममात्रेत एकत्र मिसळून त्वचेवर लावावे. यानंतर १५ मिनिटांनी स्नान करावे. याने त्वचेचे सौंदर्य वाढते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ३ सप्टेंबर २०२५

**परिवर्तिनी एकदशी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, पू.षा. २३।०९, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३४ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे. योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल.

**वृषभ** : आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रितीने कार्य करण्यास आपली मदत करेल. गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश मिळेल.

**मिथुन** : आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्या. योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. इतर लोकांबरोबर काही विषयांवर संमती द्यावी लागू शकते.

**कर्क** : आपल्या आवडीच्या नातलगांना भेटा आणि स्वत:बद्दल त्यांची प्रतिक्रिया मिळवा. आपण आपल्या घराच्या वाढीबाबत काही योजना बनवू शकता. कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील.

**सिंह** : आपल्या आवडीच्या नातलगांना भेटा आणि स्वत:बद्दल त्यांची प्रतिक्रिया मिळवा. आपण आपल्या घराच्या वाढीबाबत काही योजना बनवू शकता. शांत राहाण्याचा प्रयत्न करा.

**कन्या** : आजचा दिवस आपल्यासाठी नवी सुरुवात करण्यास किंवा व्यक्तीमत्वाचे ध्येय ठरावण्यास साहाय्यक असू शकतो. आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोन प्रदर्शित करा.

**तूळ** : बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागेल. आर्थिक विषयांमध्ये सावगिरी बाळगा. सुख–शांतीचे वातावरण राहील.

**वृश्चिक** : व्यापार व प्रणयाच्या क्षेत्रात यश मिळेल. प्रिय व्यक्तीबरोबर संवाद होईल. आवश्यक कार्य देखील पूर्ण होतील. पत्नीशी बोलल्यानंतर मूड छान होईल. आपली इच्छा असेल तर दिवास्वप्नही खरी ठरू शकतात.

**धनु** : नवीन जोखिम असलेली कार्ये टाळा. आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये. प्रेमीजनांसाठी आजचा दिवस आनंदाने परिपूर्ण असेल.


**मकर** : आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये. आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोन प्रदर्शित करा.

**कुंभ** : आपल्या मित्रांना रात्रीचे जेवण आणि नृत्यासाठी बाहेर घेऊन जाण्यापूर्वी विचार करा. कार्यात यश मिळविण्यासाठी आपले मत ठामपणे मांडा.

**मीन** : मानसिक सुख–शांतीचे वातावरण राहील. नोकरदार व्यक्तींना कामात अनुकूल वातावरण मिळेल. मित्रांचा पाठिंबा मिळेल. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२५५ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :–** १) उसाचा घट्ट कढविलेला रस ४) शेवट; अखेर; अंत ६) लढाईचे मैदान; युद्धभूमी ७) पडणे; नाश; पतन ८) भांडण उकरून काढणे; खुसपट १०) वाचून; शिवाय ११) भारताच्या उत्तरेकडील एक देश १२) वर्तमान दिवस; चालू दिवस १३) दुर्योधनाचे शस्त्र; हनुमानाचे शस्त्र १४) चोप; ताडन १५) रजत; लोक; प्रजा १६) एक धातू; चांदी; रुपे १८) कपड) कारस्थान; कट २०) घट्ट धरून ठेवण्याचे हत्यार; चिमटा २२) तप्त; तापलेले; रसरशीत २३) उपहास; फजिती

**उभे शब्द :–** १) कडक पाठ असलेला एक जलचर २) कमी; अल्प ३) रणरागिणी; रणात शौर्य गाजविणारी ४) टोकदार; नोकदार ५) मध्ये खंड न पडता पडणारी धार ७) अधर्म; पातक ९) जंगल; शेत; वावर १०) ओसाड जागेतील वास्तव्य १२) चालू काळात; वर्तमान काळात १४) मातीने भरलेले १७) देवाचे नाव, मंत्र यांचा पुन्हा पुन्हा उच्चार १९) झोपताना डोक्याखाली घेतात ती मऊ वस्तू २१) भय; भीती

**शब्दगंध क्र. ७२५४ चे उत्तर**



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : दैव हे समुद्राप्रमाणे खोल आणि विस्तीर्ण आहे; पण आपल्या कर्तबगारीची भांडीच लहान आहेत.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## काही जणांच्या तोंडाला दुर्गंधी का असते?

हा अनुभव तुम्ही कधी तरी घेतलाच असेल. समोरच्याने बोलायला तोंड उघडावे आणि एकदम दुर्गंधी यावी. असे का बरे होते?

सकाळी उठल्या–उठल्या दात घासलेले नसताना आपल्या सगळ्यांच्याच तोंडाला दुर्गंध येईल. रात्रभर तोंड बंद असल्याने असा वास येतो; पण इतर वेळा मात्र निरोगी माणसाच्या तोंडाला दुर्गंधी येत नाही. तोंडाला दुर्गंधी येण्याची अनेक कारणे आहेत. दातांना कीड लागली असल्यास दुर्गंधी येते. हिरड्यांतून संसर्गामुळे पू येत असेल, तरी तोंडाला दुर्गंधी येते. तोंडाची अस्वच्छता, तोंड, घसा, जीभ यांना झालेला जंतूसंसर्ग; लाळग्रंथींचा जंतूसंसर्ग या सर्वांमुळे तोंडाला दुर्गंधी येते. या स्थानिक कारणांखेरीज शरीरातील इतर इंद्रियांच्या रोगांमुळेही तोंडाला विशिष्ट असे वास येतात. फुफ्फुसात झालेला पू, ब्रॉन्कीएक्टॅसीससारखा रोग यांमुळे दुर्गंधी येते. खूप धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींच्या तोंडाला दुर्गंधी येते. यकृताच्या गंभीर आजारात तोंडाला माशासारखा वास येतो. मूत्रपिंडाचे कार्य बंद पडल्यास तोंडाला अमोनियाप्रमाणे वास येतो. मधुमेहाच्या गुंतागुंतीमध्ये तोंडाला गोडसर फळांसारखा वास येतो.

तोंडाला दुर्गंधी येण्याची कारणे आपण पाहिली, स्थानिक कारणांमुळे येणारी दुर्गंधी ही त्या भागातील जंतूसंसर्गामुळे असते तर फुफ्फुसाच्या, यकृताच्या वा मूत्रपिंडाच्या रोगांमुळे येणारी दुर्गंधी ही श्वासामधून येते. त्यामुळे अशा वेळी नुसते तोंड स्वच्छ ठेवून वा दात घासून ती दुर्गंधी कमी होणार नाही. त्यासाठी मूळ रोगावरच उपचार घ्यावे लागतील; पण सामान्यतः तोंडाला येणारी दुर्गंधी स्थानिक कारणांमुळेच असते व वैयक्तिक स्वच्छता ठेवल्याने ती कमी होऊ शकते.

## प्रल्हाद अख्यान

ही कथा श्री वसिष्ठांनी श्रीरामांना योगवसिष्ठातील उपशम प्रकरणात सांगितली आहे. उपासनेच्या योगाने देवाची कृपा होऊन ज्ञानसंपन्नता कशी येते, तसेच आत्मज्ञान होण्याला स्वप्रयत्नांची व विचाराची आवश्यकता आहे, असे यावरुन स्पष्ट होते. ती कथा अशी–

पाताळाचा राजा हिरण्यकश्यपू फार उद्दाम झाला, तेव्हा नृसिंहावतार घेऊन विष्णूंनी त्याला मारले. इतर दैत्य घाबरून गेले. भगवान विष्णू परत गेल्यावर प्रल्हादाने दैत्यांचे सांत्वन करून त्यांना बोध दिला. नंतर त्याने विचार केला, देव अतुल पराक्रमी आहेत. त्यांनी माझा पिता व बलाढ्य असुर यांना धुळीस मिळवले. त्यांच्यावर आक्रमण करुन गेलेले वैभव मिळवणे अशक्य आहे. मग आता भक्तीने त्यांना वश केले पाहिजे. 'नमो नारायणाय' असा जप करुन त्याने तपाला सुरवात केली.

हे पाहून सर्व देव आश्चर्यचकित झाले. यात दैत्यांचे काहीतरी गुप्त कारस्थान आहे, असा संशय त्यांनी विष्णूकडे व्यक्त केला. त्यावर विष्णूंनी त्यांना समजावले, बलाढ्य राक्षस माझी भक्ती करून जास्त बलाढ्य होतात हे खरे, पण प्रल्हादाच्या भक्तीमुळे घाबरू नये. त्याचा हा अखेरचा जन्म असून, तो मोक्षार्थी आहे.

प्रल्हादाच्या भक्तीमुळे त्याच्या मनात विवेक, वैराग्य, आनंद या गुणांचा विकास झाला. भोगांबद्दलची आसक्ती संपली. भगवान विष्णू प्रसन्न होऊन 'तू परमपदाला पोचशील' असा वर दिला. ईश्वरदर्शनाने प्रल्हादाचा अहंकार गळाला. तो शांत, सुखी, समाधीस्थित झाला. अशा स्थितीत पुष्कळ काळ लोटला. त्या वेळी दानवांनी त्याला जागृत करण्याचा प्रयत्न केला. दानवांना कोणी शासक राहिला नाही. देवांना असुरांची भीती राहिली नाही. शेषशय्येवर निजलेला श्रीविष्णू जागा झाला तेव्हा मनाने त्याने तिन्ही लोकांची स्थिती अवलोकन केली.

दैत्यांचे सामर्थ्य कमी झाले असून, देव शांत झाले आहेत, त्यांनी दैत्य व मनुष्यांचा द्वेष करणे सोडले आहे. अशा स्थितीत पृथ्वीवरील यज्ञयागादी क्रिया बंद पडतील. भूलोक राहणार नाही, हे त्रिभुवन कल्पांतापर्यंत राहावे या संकल्पाला बाधा येईल. म्हणून दानवांचे राज्य राहिले पाहिजे. त्यासाठी प्रल्हादाला सावध केले पाहिजे. मग श्रीहरी पाताळात जाऊन पोचले. त्यांनी प्रल्हादाला त्याचे राज्य व देह याचे स्मरण दिले.

विष्णूच्या आज्ञेनुसार प्रल्हादाने राज्याभिषेक करवून घेतला. भय, क्रोध, कर्मफळ यापासून विमुक्त होऊन त्याने राज्य केले व शेवटी परमपदाला पोचला. अशा रीतीने स्वप्रयत्नाने त्याने सर्व काही प्राप्त करून घेतले.

# जीवन का अमृत (भाग १)



सूरत–शब्द योग के महापुरुषों ने हम पर बहुत बड़ी कृपा की हुई है। नामदान के समय ही वे जिज्ञासु की सुरत अथवा ध्यान को आज्ञाचक्र पर ले आते हैं और उनका नूरी स्वरूप शिष्य के अंग–संग हो जाता है। शिष्य को एकाग्रता का अभ्यास करना होता है, जिसमें गुरु–शक्ति मददगार होती है। आज्ञाचक्र पर सुरत के एकाग्र होते ही सतुगुरु शिष्य की सुरत को अपनी गोद में ले लेता है। यहाँ आकर शिष्य का काम सम्पूर्ण हो जाता है। गुरुस्वरूप फिर शिष्य की सुरत को आध्यात्मिक मंडलों को पार कराता हुआ तब तक चैन नहीं लेता, जब तक कि उसे सत्पुरुष की गोद में लीन नहीं करा देता। ध्यान की एकाग्रता प्राप्त करने में केवल शब्द का अभ्यास मददगार है, अन्य साधन नहीं।

इस शब्द में गुरु अर्जनदेव जी महाराज एक आम इंसान की तरह परमात्मा से प्रार्थना कर रहे हैं कि हे परम पिता!

### गुरू और परमात्मा

आप मुझे बताइए कि मुझ में कैसे गुण हों, ताकि मैं आपके दर्शन कर सकूँ। जब भी इंसान के अंदर एक ख्वाहिश, कशिश पैदा होती है कि वह प्रभु से मिले, तो उसकी आत्मा से एक पुकार उठती है। गुरु अर्जनदेव जी महाराज हमें उस अवस्था की बात समझा रहे हैं, जब इंसान बौद्धिक स्तर पर अपने आपको प्रभु का अंग समझता है, उसे मालूम हो जाता है कि उसकी संभाल करनेवाला कोई है! उसे यह अहसास हो जाता है कि दुनिया में प्रभु के सिवाय उसका कोई नहीं है, जो उसकी मदद कर सके। उसके दोस्त, रिश्तेदार, संबंधी चंद दिनों तक उसके साथ रह सकते हैं, सदा के साथी नहीं बन सकते। जब हमें किसी प्रभु रूप महापुरुष की सोहबत मिलती है, तो वे हमें अपनी गोद में बैठाकर निजधाम ले जाते हैं। इस दुनिया में सबसे ज़्यादा प्यार माँ–बाप अपने बच्चों से करते हैं। माँ और बच्चे के प्यार को सबसे पवित्र और गहरा माना गया है। परमात्मा सभी को बनाने वाला है। जब बच्चा माँ के गर्भ में होता है, तो उसकी संभाल प्रभु ही करता है। माँ के शरीर में बच्चे के लिए दूध परमात्मा ही लाता है। यह सब प्रभु की देन है। प्रभु सबसे प्यार करता है। जो कोई भी इस धरा पर आता है, उसके लिए प्रभु पहले से ही प्रबन्ध कर देते हैं। जब आग जलती है, तो ऑक्सीजन ख़ुद–ब–ख़ुद मदद के लिए आ जाती है। हमें सांस लेने के लिए ऑक्सीजन और नाइट्रोजन का mixture (मिश्रण) चाहिए, जिसका atmosphere (वायुमंडल) में प्रभु ने प्रबन्ध किया हुआ है। यहाँ गुरु अर्जनदेव जी महाराज समझा रहे हैं :

**कवन गुन प्रान पति मिलउ मेरी माई ।।**

हे प्रभु ! मुझे कौन सा गुण अपने आप में लाना है ? मेरे परमेश्वर, मेरे माता–पिता आप मुझसे मिलिए, किसी भी तरीके से मिलिए। मैं अपने आपको किस अवस्था में पहुँचाऊँ, यह आप मुझे समझा दीजिए।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग – २)

१५. आप ब्राह्मण आत्मायें पुरुषोत्तम आत्मायें हो। प्रकृति पुरुषोत्तम आत्माओं की दासी है। अभी आप न सिर्फ आत्माओं का परिवर्तन करते हो लेकिन प्रकृति का भी परिवर्तन करते हो। जितनाजितना आपके शक्तिशाली सतोप्रधान वायब्रेशन होंगे उतना प्रकृति और मनुष्यात्माओं की वृत्ति दोनों ही चेंज हो जायेंगी। मनुष्यात्माओं को वृत्ति से चेंज करना है और प्रकृति को वायब्रेशन द्वारा परिवर्तन करना है। तो परिवर्तन करनेवालों की वृत्ति सदा ही शक्तिशाली चाहिए, साधारण नहीं।

१६. आपकी पवित्र दृष्टि से विश्व की आत्मायें और प्रकृति दोनों पवित्र बन रही हैं। आपकी दृष्टि से सृष्टि बदल रही है। आपके श्रेष्ठ कर्मों से श्रेष्ठाचारी दुनिया बन रही है।

१७. आप बच्चे याद के बल से विश्व को परिबर्तन करते हो। याद माना शान्ति की शक्ति, इससे व्यक्ति भी बदल जायेंगे तो प्रकृति भी बदल जायेगी। तो व्यक्तियों को भी बदलना है और साथ में प्रकृति को भी बदलना है। प्रकृति को मुख का कोर्स तो नहीं करायेंगे। व्यक्तियों को तो कोर्स करा देते हो लेकिन प्रकृति को योगबल से ही बदलेंगे।

### आज्ञा चक्र

१८. आपके अन्दर सिर्फ एक ही संकल्प हो 'बाप और आप' इसी को ही योग कहते हैं। जब पॉवरफुल योग में बैठेंगे तब और सब संकल्प शान्त हो जायेंगे। बाप के मिलन की अनुभूति के सिवाय और सब संकल्प समा जायेंगे। संकल्पों का विस्तार न हो, स्टॉप कहो और स्टॉप हो जाएं, फल ब्रेक लगे। ऐसी कन्ट्रोलिंग पावर हो।

१९. आपकी भावना का फल विश्व की आत्माओं को परिवर्तन कर रहा है और आगे चल प्रकृति सहित परिवर्तन हो जायेगा। आप आत्माओं की श्रेष्ठ भावना इतना श्रेष्ठ फल प्राप्त कराने वाली हो।

२०. आप अपनी शुभ भावना का महत्व जानते हो, अपनी शुभभावना को साधारण रीति से कार्य में लगाते चल रहे हो वा महत्व जानकर चलते हो? दुनियावाले भी शुभ भावना शब्द कहते हैं।

लेकिन आपकी शुभ भावना सिर्फ शुभ नहीं लेकिन शक्तिशाली भी है क्योंकि आप संगमयुगी श्रेष्ठ आत्माएं हो, संगमयुग को ड्रामा अनुसार प्रत्यक्ष फल प्राप्त होने का वरदान है। सिर्फ इसके महत्व को जानकर इसका प्रयोग करो।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

'बाबा! ऋणको म्हणजे काय?'
'जो पैसे देणे लागतो असा माणूस.'
'आणि धनको म्हणजे?'
'ज्याला पैसे मिळतील असं वाटतं तो माणूस.'

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* यावर्षी महिलांचा १९ वर्षांखालील टी–२० क्रिकेट वर्ल्ड कपचे आयोजन कोठे करण्यात आले आहे? – मलेशिया

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आरोग्य सखी

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

**अ) सर्वग्रह :** संपूर्ण आहाराचा एकत्रित विचार करून तो किती प्रमाणात असावा, याबद्दलची माहिती म्हणजे सर्वग्रह होय. अर्थात जेवताना आहार किती प्रमाणात घ्यावा, हे सर्वग्रहमधून समजते. बैठे काम करणाऱ्यांचा आहार कमी प्रमाणात असावा, तर कष्टाची कामे करणाऱ्यांचा आहार जास्त प्रमाणात असावा. म्हणून प्रत्येकाने स्वतःची प्रकृती, वय, कामाचे स्वरूप व आहार पचविण्याची क्षमता यांचा विचार करूनच आहार घ्यावा. एकच आहाराचा नियम सर्वांना लागू होणार नाही. तरी साधारणतः आमाशयाचे (Stomach) चार भाग करून त्यातील दोन भाग आहारीय अन्नपदार्थ, एक भाग पाणी, तर एक भाग हवेसाठी रिकामा ठेवावा. अशा पद्धतीने घेतलेला आहार आरोग्याचे रक्षण करतो, तर तडस लागेपर्यंत जेवण केले, तर त्यातून नक्कीच व्याधीनिर्मिती होते.

**ब) परिग्रह :**

परिग्रह म्हणजे आहारातील प्रत्येक पदार्थाची मात्रा ठरविणे होय.

**उदाहरणार्थ** : जर पदार्थ पचावयास जड असेल, तर त्याचे प्रमाण आहारात कमी असावे. जे पदार्थ पचावयास हलके आहेत असे पदार्थ आहारात भरपूर घ्यावेत.

**उदाहरणार्थ** : पुरणपोळी, बासुंदी हे पदार्थ पचावयास जड असल्याकारणाने प्रत्येकाने ते कमी खावेत. तर गरम सूप, पेज, हे पदार्थ पचावयास हलके असल्याने ते जास्त प्रमाणात खावेत.

देश म्हणजे स्थान याचा विचार दोन प्रकारे करावा लागतो. एक म्हणजे आहारीय पदार्थ ज्या ठिकाणी उत्पन्न झाले ते स्थान व दुसरे म्हणजे तो पदार्थ कोठे सेवन केला जातो, अर्थात खाल्ला जातो ते स्थान.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# होश वालों को खबर क्या...अशा गझल व वतन को सबने सिंचा है...या शायरीने वाह..वाह..क्या खूब है.. बहुत बढीया..च्या कळकळाटमध्ये गणेश फेस्टिवलचा मुशायरा रंगला

नगर – राष्ट्रीय एकात्मता शहिदांचे बलिदान देशभक्ती महागाई हिंसाचार निरअपराधांचा मृत्यू मानवता अशा सामान्यांचे मनात खदखद असलेल्या गंभीर विषयांवर देशाच्या विविध भागातून आलेल्या शायरांनी आपल्या प्रभावी आणि भेदक रचना सादर केल्या. आणि रहमत सुलतान सभागृहातील नगरकर या शायरी व गीत गझलला तितकीच दिलखुलास आणि अंतकरणापूर्वक दाद देत होते.

मखदूम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी व नगर व्यासपीठ तर्फे गणेश फेस्टिवल मध्ये गीत गज़ल मुशायराचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी नागपूर येथील कवी शदाब अंजुम हे होते.

यावेळी यावेळी जामखेडचे शाकीर अहमद यांच्या शायरीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. डॉ.दमण काशीद यांनी... होशवालों को खबर क्या बेखुदी क्या चीज है.. ही गजल सादर करून सभागृहाला वाहवाहच्या गजरात मध्ये हिरवून टाकले. तर डॉ. कमर सुरूर यांनी.. वतन को सबने सिंचा है कमर अपना लहू देकर, वतन की इन बहारों में सभी की हिस्से दारी है..या गझलचे प्रभावी सादरीकरण करून सभागृहात राष्ट्रीयत्वाची भावना प्रखरतेने निर्माण करताना त्यांचा एकेक शब्द उपस्थितांना मंत्रमुग्ध आणि अंतर्मुख करून गेला. तर पुणे येथील अमित झा राही म्हणाले की ..गाव की सादगी नसनस मे बसी है उसके, उसकी जुल्फों से मुझे धान की खुशबू आये... या गजल द्वारे त्यांनी आपल्या धरतीला प्रियसी मानून त्याला सौंदर्य प्राप्त करण्याच्या बाबतीत आपल्या शायरी मध्ये प्रखरपणे मांडणी केली. पुढे या माहोल्ला हास्य मध्ये रंगविण्यासाठी बिलाल अहमदनगरी यांनी आपली कवितेत सांगितले की.. पोटा मेरा सुंता नही.. या हास्य कवितेच्या माध्यमातून नवीन पिढी कशी वाम मार्गाला लागली आहे याबाबत मांडणी केली. तर मालेगाव येथील इमरान राशीद यांनी.. मै नही चाहता मेरी तरह रोये वो भी, इसलिये उसको हसाने के लिए हसता हुं.. या कवितेद्वारे चांगली माणसे दुसऱ्यांना सुखी करण्यासाठी कसे स्वतःचे दुःख लपवून दुसऱ्यांना हसवतात याबद्दल मांडणी केली.

तर संजय भिंगारदिवे यांनी कव्वाली.. झूम बराबर झूम शराबी याद्वारे कार्यक्रमात चहल पहल व अति उत्साह निर्माण करुन भरपूर वाह..वाही मिळविली. या व्यतिरिक्त कार्यक्रमांमध्ये जावेद मास्टर, दिनेश मंजरतकर, सुनील भंडारी, सईद खान आदींनी गीत गझल सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले.

## धर्माच्या भिंती तोडून टाकत देशभक्ती जगवणारा मखदूमचा मुशायरा



मखदूम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी व नगर व्यासपीठ तर्फे गणेश फेस्टिवलमध्ये गीत गज़ल मुशायराचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी नागपूर येथील कवी शदाब अंजुम हे होते.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या नगर फेस्टिवलमध्ये हा उर्दू नजाकतीचा माहोल दाटला होता. व्यासपीठावर अतिथी म्हणून डॉ. दमन काशीद, इंजि. इकबाल सय्यद, सुहासभाई मुळे, युनुसभाई तांबटकर, पवन नाईक, डॉ. अशपाक पटेल, सलीम खान पठाण, डॉ.कमर सुरुर, संध्याताई मेढे, डॉ. जैनब पटेल, भैरवनाथ वाकळे, इमाम सर, इंजि. अभिजीत वाघ, संजय भिंगारदिवे, डॉ. शमा फारुकी, अमर गुरप, पत्रकार जहीर सय्यद, जावेद तांबोळी, शरफुद्दीन शेख, अमिन धाराणी, शफकत सय्यद, राजूभाई शेख, आरिफ सैय्यद आदी उपस्थित होते. यांच्या हस्ते गीत गज़ल मुशायराचे दीप प्रज्वलन करण्यात आले.

प्रास्ताविक करताना मुशायऱ्याच्या समन्वयक डॉ. कमर सुरूर म्हणाल्या की सर्व समाज मनापासून एक व्हावा हा महोत्सवाचा उद्देश कार्यक्रमातून सफल झाला. हा खऱ्या अर्थाने सामाजिक धार्मिक ऐक्याचा कार्यक्रम असल्याचे त्या म्हणाल्या.

यावेळी नगर महोत्सवाचे संयोजक सुधीर मेहता यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मुशायऱ्यासाठी डॉ. दमण काशीद, शौकत तांबोली, के के खान, रिजवान बिलाल अहमद, अमर गुरप, डॉ. इमरान शेख, प्रा. डॉ. सलाम सर, शरफुद्दीन शेख आदींचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाची रुपरेषा व सूत्रसंचालन आबीद खान यांनी केले. डॉ. शमा फारुकी यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी राजू भाई शेख, शफकत सय्यद, आरिफ सय्यद, तनवीर चष्मावाला, अमजद पठाण, जावेद मास्टर, अमीन धाराणी, जावेद तंबोली व मखदूम सोसायटीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# विठ्ठल-रुक्मिणी युवा प्रतिष्ठानचा हिंदू संस्कृती जपणारा गणेशोत्सव; 'डिजे'ला फाटा देऊन विसर्जनासाठी भजनी मंडळ राहणार उपस्थित

नगर – शहरातील नानाजीनगर, औसरकर मळा येथे विठ्ठल रुक्मिणी युवा प्रतिष्ठान दरवर्षी पारंपारिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करीत असून यावर्षी देखील हा उत्सव धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहात पार पडत आहे. हिंदू संस्कृतीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने गणपती बाप्पाच्या मूर्तीसमोर सकाळी काकड भजन आणि संध्याकाळी हरिपाठ व भजनाचे कार्यक्रम दररोज आयोजित केले जात आहेत.



गणेश मिरवणूकीत उपस्थित राहणारे विठ्ठल-रुक्मिणी युवा प्रतिष्ठानच्या भजनी मंडळाचे सदस्य.

गणेशोत्सव काळात तसेच मिरवणुकांमध्ये साऊंड सिस्टीमवर चित्रपटातील गाणे न लावता फक्त धार्मिक गाणी लावावीत, डिजेला फाटा देऊन उत्सव साजरा करावा, असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे. त्यामुळे परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्मिती झाली असून महिला वर्गासह नागरिक उपस्थित राहत आहेत.

प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सागर पवार म्हणाले की, गणेशोत्सव हा केवळ मनोरंजनाचा नव्हे तर आपली संस्कृती जपण्याचा आणि भावी पिढीला धार्मिक संस्कार देण्याचा उत्सव आहे. युवकांनी उत्सवात डिजेला फाटा देत पारंपारिक पद्धतीने भजनी मंडळ, टाळ-मृदंग, हरिपाठ यांच्या माध्यमातून धार्मिक सोहळ्यांचा प्रचार करावा. हा उत्सव समाज एकतेचा आणि संस्कृतीच्या जतनाचा ध्यास घेऊन साजरा करणे हेच आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.

मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेश विसर्जनाची मिरवणूक डिजेशिवाय, भजनी मंडळाच्या उपस्थितीत टाळ-मृदंगाच्या गजरात काढण्यात येणार आहे. संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी इतर गणेश मंडळांनीही अशा धार्मिक पद्धतींचा अवलंब करावा, असे आवाहन प्रतिष्ठानने केले आहे.

प्रतिष्ठानच्या या धार्मिक सोहळ्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी महिला भजनी मंडळाच्या आयोजिका अनिता पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ऊर्मिला काटेकर, रत्नप्रभा घोलप, जयश्री गव्हाणे, शोभा कलमकर, जयश्री उंडे, लता राऊत, रुक्मिणी नवसूपे, सोनाली काळे, सुरेखा चौरे, पुष्पलता गव्हाणे, सरला मुंदडा, चित्रा भोसले, मंगल कराळे, शुभांगी दाणी, उषा शेळके, गया घोलप, कमलताई उकिरडे आदींसह विठ्ठल रुक्मिणी युवा प्रतिष्ठानचे सदस्य परिश्रम घेत आहे.

# पुष्ट्यापासून साकारला जेजुरी गडाचा देखावा



नगर – शहरातील पाईपलाईन रोड, भिस्तबाग चौक येथे यंदा गणेशोत्सवात एक वेगळेच आकर्षण नागरिकांना अनुभवायला मिळत आहे. ॲड. संकेत बारस्कर व सौ. निकिता बारस्कर यांनी जय मल्हारांच्या जेजुरी गडाची हुबेहूब प्रतिकृती उभी करून भाविकांचे लक्ष वेधून घेतले आहे. हा देखावा घरगुती असूनही त्यात केलेली बारकाई, सादरीकरणातील कलात्मकता आणि वातावरणनिर्मिती पाहणाऱ्यांना थक्क करत आहे.

बारस्कर दांपत्याने पुष्टा वापरून जेजुरी गडाचा संपूर्ण देखावा उभारला आहे. गडावरील दरवाजे, गडाची भिंत, मुख्य मंदिराचा परिसर, भंडाऱ्याची झालेली उधळण यांचे जिवंत चित्रण या देखाव्यात करण्यात आले आहे. विशेष म्हणजे देखाव्याच्या मध्यभागी श्री गणेशाची आकर्षक मूर्ती स्थापन करण्यात आली आहे. गडावर भाविकांप्रमाणेच येथेही नागरिकांना जय मल्हारचा जयघोष ऐकू येत असल्याचा भास होत आहे.

गणेशोत्सवात पारंपरिक सजावटींबरोबरच समाजप्रबोधनात्मक किंवा सांस्कृतिक देखावे उभारले जातात. परंतु, या वेळी बारस्कर दांपत्याने ऐतिहासिक व धार्मिक दृष्ट्या महत्वाचा असलेल्या जेजुरी गडाचा देखावा उभारून एक आगळीवेगळी कल्पना साकारली आहे.

परिसरातील नागरिक उत्साहाने या देखाव्याला भेट देत आहे. या देखाव्यामुळे लहान मुलांना जेजुरी गडाबद्दल माहिती मिळत आहे. घरबसल्या जेजुरी गडाचे दर्शन होत असल्याने वयोवृद्धांपासून तरुणांपर्यंत सर्वांनी या कल्पनेचे कौतुक केले आहे.



गणेशोत्सवानिमित्त जय आनंद महावीर युवक मंडळातर्फे उत्कर्ष बालगृह संस्थेला अन्नधान्याची मदत करण्यात आली.

# गणेशोत्सवानिमित्त 'जय आनंद'तर्फे उत्कर्ष बालगृह संस्थेला अन्नधान्याची मदत

नगर – नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाच्या गणपतीची आरती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या हस्ते करण्यात आली. उत्कर्ष बालगृह संस्थेस मंडळाच्या वतीने अन्नधान्याची मदत सुपुर्द करण्यात आली.

याप्रसंगी महावितरणच्या तेलीखुंट पॉवर हाऊसचे प्रमुख रोहन धर्माधिकारी, भाजपाचे माजी शहर जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे, जैन ओसवाल पतसंस्थेचे संचालक संतोष गांधी, ऋग्वेद गंधे, सुमित बटोळे, वेंकटेश बोमादंडी, संजय मुनोत, वीज कर्मचारी कुशल पडोळे, पारेश्वरा पोटकुल, शरद सोनवणे, राजेंद्र भागडे, मंगेश तळवले, रोहित खरजुले, मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, उपाध्यक्ष राहुल सावदेकर व संतोष कासवा, सेक्रेटरी आनंद मुथा, प्रकाश गांधी, सत्येन मुथा, हेमंत मुथा, चेतन गुगळे, बाबालाल गांधी, अजय गांधी, अभी दंडवते उपस्थित होते.चेतन गुगळे यांनी आभार मानले.

# हनुमाननगर येथे शिवाजी डोके यांच्या घरी गौरी गणपतीचे उत्साहात स्वागत

## सजावटीतून पर्यावरण समतोलाचा संदेश : दैवशाला डोके

नगर – गणेश उत्सव काळात गौरी गणपतीचे आगमन हा एक अनोखा आनंदाचा क्षण असतो. धार्मिक परंपरेमध्ये गौरी गणपतीला विशेष स्थान असून त्यांच्या आगमनापूर्वी घराघरात उत्साहाचे वातावरण निर्माण होते. घरातील मंडळी सजावटीत रमून जातात. गौरी गणपतीच्या आगमनानंतर विविध भाज्यांचा नैवेद्य केला जातो, याला धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व आहे. आपली संस्कृती, परंपरा महान असून तिचे जतन करणे आणि पुढच्या पिढीकडे वारसा म्हणून देणे हे आपले कर्तव्य आहे. धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून संस्कृतीचे जतन आणि जोपासना केली जाते. यावर्षीच्या गौरी गणपती उत्सवानिमित्त डोके परिवाराच्या वतीने पर्यावरण समतोल राखण्याचा संदेश देणारी सजावट व देखावा सादर करण्यात आला. हा संदेश महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन दैवशाला डोके यांनी केले.



गौरी गणपती उत्सवाच्या निमित्ताने पाईपलाईन रोड हनुमाननगर येथील शिवाजी डोके यांच्या घरी गौरी गणपतीचे आगमन याप्रसंगी सजावटीतून पर्यावरण समतोलाचा संदेश देण्यात आला. (छाया – लहू दळवी)

गौरी गणपती उत्सवाच्या निमित्ताने पाईपलाईन रोड हनुमाननगर येथील शिवाजी डोके यांच्या घरी आमदार संग्राम जगताप यांनी भेट देऊन गौरी गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी डोके परिवाराच्या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले. गौरी गणपतीचे आगमन म्हणजे घराघरात आनंद, उत्साह आणि एकोप्याचा माहोल. या प्रसंगी एकत्रितपणे कुटुंबीय, नातेवाईक आणि समाजातील लोक एकत्र येऊन श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा गौरव करतात. यावर्षी देखील हनुमाननगर परिसरात धार्मिक वातावरण लाभले.

पाईपलाईन रोड हनुमाननगर येथील शिवाजी डोके यांच्या घरी झालेल्या या कार्यक्रमात महाआरती दरम्यान दैवशाला डोके, शिवाजी डोके, ओम डोके, नानासाहेब डोके, यशवंत जोंधळे, डॉ. दिलीप जोंधळे, सुजाता जोंधळे, डॉ. वसुंधा जोंधळे, ज्ञानेश्वर जोंधळे आदींसह परिसरातील महिला व नागरिक उपस्थित होते.

# योग शिक्षक पदविका प्रवेश वगार्साठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदत

नगर – यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाद्वारे घेण्यात येणाऱ्या योग शिक्षक पदविका (पी १२६) अभ्यास क्रमाची २०२५-२६ या वर्षाकरिता प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली असून १५ सप्टेंबर पर्यंत मुदत वाढ करण्यात आली आहे, असे अभ्यासक्रमाचे समन्वयक प्राचार्य अडाणे यांनी सांगितले.

सदर अभ्यासक्रमास युजीसी मान्यता असल्यामुळे ज्या साधकास योगामध्ये आपले करियर करावयाचे आहे, त्यांना या परीक्षेचा भरपूर फायदा होईल. फक्त रविवारी वर्ग असल्याने तुमचा सध्याचा अभ्यासक्रम चालू ठेवून हा डिप्लोमा पूर्ण करता येईल. या अभ्यासक्रमास योग विद्या गुरुकुल नाशिक अंतर्गत योग महाविद्यालयात नाशिक यांना मान्यता मिळाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी ९४०५०००६८०, ९८२३७८१२४६, ७३८७४४२२८८ या क्रमांकावर संपर्क करावा.



### पर्वते कुटुंबियांच्या घरी केलेली महालक्ष्मीची सजावट

सारसनगर, चिपाडे मळा नानाजीनगर येथील रहिवासी अहिल्या रामचंद्र पर्वते, योगीता कालिदास पर्वते, गिता सचिन पर्वते, मनिषा राज पर्वते, एकता स्वप्निल पर्वते या पर्वते कुटुंबियांमधील महिलांनी महालक्ष्मीची केलेली सजावट.



### ॲड. सचिन पाठक गुरुजी यांच्या घरी केलेली महालक्ष्मीची सजावट

गणरायांच्या आगमनानंतर सोनपावलांनी गौरींचे आगमन झाले. भुतकरवाडी परिसरातील ॲड. सचिनदेवा पाठक गुरूजी यांच्या घरी महालक्ष्मीची विधिवत स्थापना करून सजावट करण्यात आली.



### नागवडे कुटुंबियांच्या घरी केलेली महालक्ष्मीची सजावट

निर्मलनगर येथील सौ. रुपाली शामराव नागवडे व शामराव हरिभाऊ नागवडे यांच्याकडे गौरीची आकर्षक सजावट करण्यात आली.



क्रिशा गुप्ता हिने साकारलेला घरगुती अष्टविनायक दर्शनाचा देखावा.

# क्रिशा गुप्ताने साकारला घरगुती अष्टविनायक दर्शनाचा देखावा

नगर – गणेशोत्सव म्हणजे आनंद, श्रद्धा आणि सांस्कृतिक विविधतेचा मिलाफ. या उत्सवात सर्जेपूरा येथील क्रिशा हितेश गुप्ता या चिमुकलीने साकारलेल्या अष्टविनायक दर्शन या घरगुती देखाव्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. घरगुती पातळीवर साकारलेला हा देखावा आकर्षक व भक्तीमय वातावरण निर्माण करणारा ठरला आहे.

क्रिशा गुप्ता ही एम आयडीसी येथील डॉ. विठ्ठलराव विखे फाऊंडेशन इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये इयत्ता ९ वीत शिकत आहे. ती पंजाबी राधा-कृष्ण मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता यांची नात आहे. लहान वयातच तिच्या कल्पकतेला आणि कलाविष्काराला साथ देत कुटुंबाने या देखाव्याची मांडणी केली आहे. श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा करुन सजविण्यात आलेल्या अष्टविनायक दर्शनासाठी परिसरातील नागरिकही हजेरी लावत आहे.

अष्टविनायकाचे एकत्र दर्शन मिळावे, ही अनेकांची इच्छा असते. हीच संकल्पना लहानग्या क्रिशाने घरगुती पातळीवर साकारत प्रत्येक मंदिराची रचना सुबकपणे मांडली आहे. अष्टविनायकाच्या इतिहास व महत्त्वाविषयी माहिती गोळा करुन तिने तो देखाव्यात प्रतिबिंबित केला आहे.



जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त मोफत त्वचारोग तपासणी शिबिराचे उद्घाटना करताना रतीलाल आदी.

# आरोग्यसेवेचा वसा जपून समाज निरोगी करण्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्य : रतिलाल कटारिया

### मोफत त्वचारोग तपासणी शिबिराला प्रतिसाद

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटलने आरोग्यसेवेचा वसा जपून समाज निरोगी करण्यासाठी शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवेचा लाभ पोहचवित आहे. हॉस्पिटलची रुग्णसेवा सर्वसामान्य घटकातील रुग्णांसाठी संजीवनी ठरत आहे. माणुसकीच्या भावनेने उभे राहिलेल्या या सेवाकार्यात योगदान देऊन समाधान मिळत असल्याचे प्रतिपादन रतिलाल कटारिया यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त मोफत त्वचारोग तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी कटारिया बोलत होते. यावेळी डॉ. विजय भंडारी, सुभाष मुनोत, परेश मंडलेचा, संतोष बोथरा, सतीश (बाबुशेठ) लोढा, वसंत चोपडा, मानकचंद कटारिया, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, त्वचारोग तज्ञ डॉ. अमित शिंदे, डॉ. भास्कर पालवे आदी उपस्थित होते.

त्वचारोग तज्ञ डॉ. अमित शिंदे व डॉ. भास्कर पालवे यांनी त्वचारोग अंगावर न काढता तात्काळ त्याचे निदान व उपचार केल्यास पुढील धोके टाळता येतात. त्वचा रोगाला वेळीच उपचार न केल्यास संपूर्ण शरीरावर पसरण्याची भिती असते. यासाठी हॉस्पिटलमध्ये विविध तपासण्या व तज्ञ डॉक्टर उपलब्ध असून, याचा लाभ घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

या शिबिरात ८० रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. गरजूंना विविध तपासण्या अल्पदरात उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. युवकांपासून ज्येष्ठांपर्यंत या शिबिरास प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले. शेवटी हॉस्पिटलमध्ये उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली.

# ‘रोटरी मिडटाऊन’ आणि ‘जे.जे. ॲकॅडमी’ आयोजित वैज्ञानिक प्रदर्शन व स्पर्धेत २७० विद्यार्थ्यांचा सहभाग




रोटरी क्लब ऑफ मिडटाऊन आणि जे.जे.सायन्स ॲकॅडमीच्या वैज्ञानिक प्रदर्शन व स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी.

नगर – रोटरी क्लब ऑफ मिडटाऊन आणि जे.जे.सायन्स ॲकॅडमीच्या संयुक्त विद्यमाने अंतरशालेय यंग इनोव्हेस्टर्स सायन्स एक्झिबिशन व स्पर्धा घेण्यात आली. या प्रदर्शनास शहरातील विविध शाळांच्या हजारो विद्यार्थ्यांनी भेट देऊन सहभागी विद्यार्थ्यांनी केलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वैज्ञानिक उपकरणांची माहिती घेतली. या प्रदर्शन व स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ नुकताच झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कॅन्सर सर्जन डॉ. सतिश सोनवणे व माध्यमिक विभागाचे जिल्हा उपशिक्षण अधिकारी आकाश दरेकर उपस्थित होते. यावेळी रोटरी मिडटाऊनचे अध्यक्ष डॉ. विनोद मोरे, सचिव महेश गोपालकृष्णन, जे. जे. सायन्स ॲकॅडमीचे संचालक कृष्णकांत झा व सदस्य उपस्थित होते.

या स्पर्धेमध्ये ३० शाळांमधील २७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. परितोषिक वितरण कार्यकमात प्रमुख पाहुणे डॉ. सतिश सोनवणे आणि शिक्षणाधिकारी आकाश दरेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वैज्ञानिक उपक्रमामुळे शालेय विद्यार्थ्यांमध्ये नाविन्य, जिज्ञासा व वैज्ञानिक दृष्टिकोन वाढण्यास मदत होईल, अशा भावना त्यांनी व्यक्त करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

डॉ. विनोद मोरे व कृष्णकांत झा यांनीही मार्गदर्शन केले.

प्रदर्शन व स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे, प्रथम सेंट मायकेल स्कूल ट्रॉफी व २०००० रुपये, उपकरण जंतुनाशक व हवा शुद्धीकरण यंत्र. द्रितीय सिक्रेट हार्ट स्कूल ट्रॉफी व १०००० रुपये, उपरण वीजनिर्मिती पार्क आधुनिकतेच्या दिशेने एक पाऊल. तृतीय रेणावीकर माध्यमिक विद्यालय ट्रॉफी व ५००० रुपये, उपरण टाकाऊ पदार्थ आणि पुनर्वापर. उत्तेजनार्थ समर्थ विद्यामंदिर व तक्षशिला स्कूल प्रशस्तीपत्रक व १५०० रुपये.

यावेळी जे. जे. सायन्स ॲकॅडमीचे योगेश जहागिदार, रोटरी क्लबचे रो.अजय पिसुटे, रो. विजय इंगळे, रो. रमेश वाबळे, रो. अशोक पानसरे, रो. विजय निकम, रो. प्रदीप ब्रम्हा, रो. मधुर बागायत, रो.प्रताप पांडे, रो. प्रियांका पिसुटे, सुजाता उबाळे, रो. टीना इंगळे, रो.सारिका मोरे, रो.सुजाता वाबळे, रो.वैशाली कराळे आदी उपस्थित होते.

रोटरीचे सचिव महेश गोपालकृष्णन यांनी आभार मानले. सूत्रसंचालन रो. हेमंत कराळे व रो. मर्लिन एलिशा यांनी केले

# ‘एम.आय.एम. महाराष्ट्र’च्या युवा अध्यक्षपदी अंजर खान



नगर – ऑल इंडिया मजलिस–ए–इत्तेहादुल मुस्लिमीन (एम.आय.एम.) च्या महाराष्ट्र राज्य युवा अध्यक्षपदी शहरातील अंजर अन्वर खान यांची निवड करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवेसी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माजी खासदार व पक्षाचे महाराष्ट्र प्रमुख इम्तियाज जलील यांच्या हस्ते ही घोषणा करण्यात आली.

इम्तियाज जलील यांनी त्यांच्या अधिकृत ट्विटर (एक्स) अकाउंटवरून अंजर अन्वर खान यांच्या नियुक्तीची माहिती देत अभिनंदन केले आहे. त्यांनी पुढील राजकीय कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करत म्हटले की, अंजर अन्वर खान यांचे युवकांमध्ये चांगले संपर्क जाळे असून, त्यांच्या नेतृत्वामुळे पक्षात अल्पसंख्यांक समाजातील युवकांचे संघटन अधिक बळकट होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अल्पसंख्यांक समाजातील युवक –युवतींच्या प्रश्नांवर एम.आय.एम. सातत्याने आवाज उठवत आहे. महाराष्ट्रात बेरोजगारी, शिक्षण, सामाजिक न्याय आणि राजकीय हक्क या विषयांवर युवकांचे प्रतिनिधित्व करणे हीच खरी जबाबदारी आहे. युवकांचे प्रश्न फक्त भाषणांत नाही तर प्रत्यक्ष कृतीतून सोडवले जातील. आगामी काळात जिल्हा आणि राज्यभर युवकांचे एक सशक्त व प्रभावी संघटन उभे करण्याचे एम.आय.एम. च्या माध्यमातून ध्येय असल्याचे अंजर खान यांनी सांगितले.

लवकरच नगर शहरासह जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये युवकांच्या मेळाव्यांचे आयोजन केले जाणार आहे. या मेळाव्यांमधून युवकांना पक्षाशी जोडून त्यांना राजकीय मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# पंडित दीनदयाल उपाध्याय जयंती कार्यक्रम तरुणांचा मोठा सहभाग अपेक्षित

### विनायक देशमुख यांचा विश्वास



पंडित दीनदयाल उपाध्याय जयंती या संदर्भात आगामी कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत बोलताना समिती सदस्य विनायक देशमुख आदी.

नगर – पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीच्या निमित्ताने २५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये जिल्ह्यातील हजारो युवक सहभागी होतील, असा विश्वास पंडित दीनदयाल उपाध्याय एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव समितीचे सदस्य विनायक देशमुख यांनी व्यक्त केला.

या संदर्भात आगामी कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न अहिल्यानगर जिल्ह्यातील महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक नुकतीच आयोजित करण्यात आली होती. यावेळी समितीचे सदस्य राजाभाऊ मुळे, विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवप्रसाद घालमे, वरिष्ठ सहाय्यक दत्तात्रय लोंढे, कनिष्ठ सहाय्यक सागर गिन्डे आदी उपस्थित होते. या बैठकीत जिल्ह्यातील ४५ पेक्षा जास्त महाविद्यालयांचे प्राचार्य झूम मीटिंग द्वारे सहभागी झाले होते.

या संदर्भातील जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाने ऑक्टोबर महिन्यात अहिल्यानगर येथे करण्याचा प्रयत्न आहे, असे श्री. देशमुख यांनी यावेळी सांगितले.

यावेळी बोलताना राजाभाऊ मुळे म्हणाले, या देशाचे पुढील पन्नास वर्षाचे भवितव्य तरुणांच्या हाती आहे. त्यामुळे पंडित दीनदयाल उपाध्याय यांचे अंत्योदयाचे क्रांतिकारक विचार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने सर्व महाविद्यालयांनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार विविध स्पर्धांचे आयोजन करावे.

प्रारंभी प्रस्ताविक करताना सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवप्रसाद घालमे कार्यक्रमाची रूपरेषा आणि स्पर्धा आयोजनाची कार्यपद्धती समजावून सांगितली. त्या अंतर्गत २५ सप्टेंबर रोजी महाविद्यालय व तालुका स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून २९ सप्टेंबर रोजी जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. प्रामुख्याने जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळा, शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय व खासगी तंत्रनिकेतने व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली महाविद्यालये अशा चार विभागांमध्ये प्राथमिक स्पर्धा होणार आहे. सर्व स्तरातील यशस्वी स्पर्धकांना प्रमाणपत्र व अन्य बक्षिसे देण्यात येणार आहेत.

# जैन सोशल फेडरेशनमार्फत आचार्यश्रींना अभिप्रेत मानवसेवा

### राजेंद्र बोरा यांचे प्रतिपादन





आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेच्या लोकार्पण प्रसंगी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज, डॉ. दर्शनप्रभाजी म.सा., डॉ. अनुपमाजी म.सा., अनुप्रेक्षाजी म.सा. आदींसह मिना बोरा, श्रीमती इच्छाबाई बोरा, अमोल बोरा, अतुल बोरा, उद्योजक पेमराज बोथरा, मनिषा बोथरा, संतोष बोथरा, सतीश बोथरा, प्रतिभा बोथरा, प्रणेश, रोनक, रोहन, गौरव, प्रसन्न बोथरा, निखिल लोढा, सुदर्शन लोढा, संजना लोढा, डॉ. अशोक महाडिक, प्रशासनाधिकारी आनंद छाजेड, डॉ. प्रतिक कटारिया, स्मिता कुंदन कांकरिया, सतीश लोढा आदी.

### आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेचे लोकार्पण

नगर – जैन सोशल फेडरेशन आचार्यश्रींना अभिप्रेत अशी मानवसेवा आनंदऋषीजी हॉस्पिटल आणि नेत्रालयाच्या माध्यमातून करत आहे. सध्या भारतात नेत्र रूग्णांचे प्रमाण मोठे आहे. वेळीच उपचार न केल्याने अंधत्व सुद्धा येते. ग्रामीण भागात ही समस्या मोठी आहे. आनंदऋषीजी नेत्रालय ही समस्या ओळखून थेट खेड्यापाड्यात शिबिरांच्या माध्यमातून रूग्णापर्यंत आपली सेवा देत आहे. तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांची टिम, उच्च दर्जाच्या तपासणी मशीन यामुळे येथे येणाऱ्या रूग्णाला निर्दोष दृष्टी प्राप्त होते. तारकपूर शाखा सुरू करून नेत्रसेवेचा आणखी विस्तार केला हे कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन उद्योजक राजेंद्र बोरा यांनी केले.

आनंदऋषीजी नेत्रालयाच्या आरोग्य सेवेचा विस्तार करण्यात आला आहे. नेत्रालयाची दुसरी शाखा तारकपूर परिसरात गंगा उद्यान रोडवर सुरू झाली आहे. धार्मिक परीक्षा बोर्ड येथे गुरुभगवंतांच्या आशीर्वादाने लोकार्पण सोहळा झाला. यावेळी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज, डॉ. दर्शनप्रभाजी म.सा., डॉ. अनुपमाजी म.सा., अनुप्रेक्षाजी म.सा. आदींसह मिना बोरा, श्रीमती इच्छाबाई बोरा, अमोल बोरा, अतुल बोरा, उद्योजक पेमराज बोथरा, मनिषा बोथरा, संतोष बोथरा, सतीश बोथरा, प्रतिभा बोथरा, प्रणेश, रोनक, रोहन, गौरव, प्रसन्न बोथरा, निखिल लोढा, सुदर्शन लोढा, संजना लोढा, डॉ. अशोक महाडिक, प्रशासनाधिकारी आनंद छाजेड, डॉ. प्रतिक कटारिया, स्मिता कुंदन कांकरिया, सतीश लोढा आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, नेत्रालयाने सावेडी उपनगरात विस्तार करून अधिकाधिक लोकांपर्यंत आपली सेवा देण्यासाठी पाऊल टाकले आहे. २०१७ पासून सुरू झालेल्या नेत्रोपचार सेवेचा हजारो रूग्णांना लाभ झालेला आहे. तज्ज्ञ डॉक्टरांसह जवळपास १७५ जणांची टिम कार्यरत आहे. नगरसह मराठवाड्यातील ग्रामीण भागात पोहोचून नेत्र उपचार सेवा दिली जाते. ग्रामीण भागातील रूग्णांना नगरला आणून मोतिबिंदू शस्त्रक्रिया केल्या जातात. आता तारकपूर गंगा उद्यान रोडवर ५००० स्क्वेअर फूटाच्या चार मजली प्रशस्त वास्तूत नेत्रालय खुले झाले आहे. असून याठिकाणी अद्ययावत तपासणी सुविधांसह आंतरराष्ट्रीय मानांकनानुसार मॉड्युलर ऑपरेशन थिएटरही आहे. जास्तीत जास्त नेत्र रुग्णांना दर्जेदार आणि परिपूर्ण उपचार मिळावेत यासाठी हा आरोग्य सेवा विस्तार करण्यात आला आहे. शिवाय याच ठिकाणी आनंदऋषीजी हॉस्पिटलची सुपर स्पेशालिटी ओपीडीही कार्यरत असणार आहे.

याठिकाणी डायग्नोस्टिक सेंटर, ओसीटी, ए–स्कॅन, ऑटो रिफ्रक्टोमीटर, रोनोमेट्री मशीन असून अनुभवी नेत्ररोग तज्ज्ञांची टिम रूग्णसेवा देणार आहे. लहान मुलांच्या तिरळेपणासह डोळ्यांच्या विविध समस्यांवर उपचार सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. नेत्रालयात मधुमेह व रेटिना, क्रॉनिया, काचबिंदू असे स्पेशालिटी क्लिनिक कार्यरत असणार आहेत. फेको पद्धतीने मोतीबिंदू शस्त्रक्रिया, इंडियन व इम्पोर्टेड कंपनीच्या मोनोफोकल व मल्टीफोकल या अत्याधुनिक लेन्सेस येथे उपलब्ध आहेत. डॉ. प्रतिक वसंत कटारिया नूतन शाखेचे इन्चार्ज आहेत. शाखेत ६ हजारांपासून ९० हजारांपर्यंत लेन्सेस उपलब्ध आहेत. निर्जंतुक सुसज्ज ऑपरेशन थिएटर येथे आहे. ऑप्टिकल शॉपमध्ये २०० रूपयांपासून २० हजार रूपयांपर्यंतचे फ्रेम, चष्मे उपलब्ध आहेत. प्रशासनाधिकारी आनंद छाजेड यांनी आभार मानले.




के. जी.कला व वाणिज्य महाविद्यालयात आविष्कार मार्गदर्शन कार्यशाळेमध्ये उद्घाटक संस्थेचे विश्वस्त किशोर मुनोत, परिसर संचालिका प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी आदी.

# के. जी.कला व वाणिज्य महाविद्यालयात आविष्कार मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात

नगर – के. जी.कला व वाणिज्य महाविद्यालयात अहिल्यानगर २९ ऑगस्ट रोजी अविष्कार स्तर संशोधन स्पर्धेसंबंधी आविष्कार मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, संशोधनाची आवड व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे हे होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे विश्वस्त किशोर मुनोत यांनी केले.

महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी विद्यार्थ्यांना दृकश्राव्य माध्यमाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना अविष्कार स्तर संशोधनाची सविस्तर माहिती दिली. यामुळे विद्यार्थ्यांना संशोधनाची नवी दिशा व आत्मविश्वास मिळाला. विद्यार्थ्यांनी उत्साहाने या सादरीकरणाचा लाभ घेतला.

तसेच बीए शाखेच्या विभाग प्रमुख प्रा. डॉ. वर्षा कीर्तने व बी.कॉम. सी.ए. विभागाच्या प्रा. स्नेहल बोरावके यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयाशी संबंधित संशोधन विषयांची माहिती दिली.

सूत्रसंचालन प्रा. आरती खेडकर यांनी केले. प्रा. सविता चव्हाण यांनी आभार मानले. याप्रसंगी महाविद्यालयाचे कार्यालयीन सचिव संतोष मुनोत, हर्षाली रासकर व विद्यार्थी उपस्थित होते.

# ज्येष्ठ साहित्यिक त्रिंबकराव देशमुख यांच्या ग्रंथाला ‘संत चरित्र गौरव पुरस्कार’ जाहीर





नगर – धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक त्रिंबकराव उर्फ बाळासाहेब देशमुख यांच्या संत आईसाहेब महाराज देशमुख आणि संत पळसेकर महाराज या संत चरित्र ग्रंथासाठी राज्यस्तरीय संत चरित्र गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

५ सप्टेंबर, शिक्षक दिनानिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे होणाऱ्या तिसऱ्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात देशमुख यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक व ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी दिली.

मांडवगण (ता. श्रीगोंदा) येथील सध्या केडगाव येथे वास्तव्यास असलेले ज्येष्ठ साहित्यिक त्रिंबकराव उर्फ बाळासाहेब देशमुख यांनी नुकतेच संत आईसाहेब महाराज देशमुख आणि संत पळसेकर महाराज यांच्या जीवन चरित्रावर ग्रंथ लिहिला आहे. भावी पिढीला मार्गदर्शक ठरणारा व संत महात्म्यांचे विचार पोहचविणारा हा ग्रंथ उपयुक्त असून, या ग्रंथाची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. तसेच त्यांची श्री क्षेत्र मांडवगण आणि सिद्धेश्वर दर्शन, आबा मास्टर, द माउंटन मॅन ही पुस्तके देखील प्रकाशित झालेली आहेत. देशमुख हे मराठी साहित्य मंडळ (मुंबई) या संस्थेचे जिल्हाध्यक्ष असून, ईपीएस ९५ या पेन्शनर संघटनेचे शहर कार्याध्यक्ष पदाची धुरा सांभाळत आहे.



शालेय जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेतील यशस्वी झालेले डॉन बॉस्को विद्यालयाचे विद्यार्थी.

# डॉन बॉस्को विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे शालेय जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत यश

नगर – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मार्फत घेण्यात आलेल्या शालेय म.न.पा. जिल्हास्तरी कॅरम स्पर्धा नुकत्याच जिल्हा क्रीडा संकुल वाडिया पार्क येथे झाल्या. या स्पर्धेमध्ये जिल्हाभरातून अनेक शहरी भागातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेमध्ये १९ वर्षाखालील मुली या गटात डॉन बॉस्को उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी प्रेरणा ब्राह्मणे ही प्रथम तर अनुष्का जेधे ही सहाव्या क्रमांकावर आली. तसेच १९ वर्षाखालील मुले या गटात आदित्य गायकवाड हा चौथ्या क्रमांकावर आला.

या सर्व विद्यार्थ्यांची पुढील होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा शिक्षक सुभाष ब्राह्मणे तसेच डॉ. शितल कोतकर यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेचे प्राचार्य फादर अजित मुनिस तसेच रेक्टर फादर रिचर्ड डिसिल्वा संस्थेचे व्यवस्थापक फादर फर्नांडिस डॉन बॉस्को इंग्रजी माध्यमाचे प्राचार्य फादर रिचर्ड बुरखाव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## कुरकुरीत ब्रेड भजी

झटपट रेसिपी

मित्रांनो, संध्याकाळी चहासोबत तुम्ही छानपैकी ब्रेडची भजी खाऊ शकता. ही कुरकुरीत भजी संध्याकाळच्या वेळी पोटभरीची ठरतील.

**सामग्री:** चार ब्रेड स्लाईस, अर्धा कप दही, पाउण कप बेसन, वाटलेली हिरवी मिरची एक चमचा, थोडी कोथबिर, चवीनुसार मीठ, तेल

**कृती:** ब्रेड स्लाईसच्या कडा कापून घ्या. उरलेल्या ब्रेडचे छोटे तुकडे करून घ्या. आता एका भांड्यात बेसन, मिरची, दही आणि मीठ घालून घट्टसर पीठ बनवून घ्या. त्यात ब्रेडचे तुकडे घाला. आता कढईत तेल गरम करायला ठेवा. आता चमच्याने हे मिश्रण हलकेच कढईत सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. कुरकुरीत आणि खमंग ब्रेड भजी चहासोबत खा.




## शेतकऱ्याची साबणनिर्मिती

अचिव्हर



असे म्हटले जाते की आवड असेल तर शेती फक्त धान्यांपुरती मर्यादित नाही, नवीन प्रयोग करून शेतकरी स्वतःसाठी रोजगार आणि ओळख दोन्ही निर्माण करू शकतात. मध्य प्रदेशातील बुरहानपूर जिल्ह्यातील एकझिरा गावातील शेतकरी सूपडू चौहान यांनी असाच एक पराक्रम केला आहे. गेल्या चार वर्षांपासून केळीची नैसर्गिक शेती करणाऱ्या सूपडू चौहान यांनी आता शेतीसोबतच नवनवीन प्रयोग करून कडुनिंब आणि कोरफडीपासून हर्बल साबण बनवण्यास सुरुवात केली आहे.

टाळेबंदीदरम्यान सर्व काही बंद होते, तेव्हा सूपडू यांनी मोबाईलवर एक व्हिडीओ पाहिला. त्यात कडुनिंब आणि कोरफडीपासून साबण बनवण्याची पद्धत समजावून सांगितली होती. सुरुवातीला त्याने लहान प्रमाणात प्रयोग केले आणि यशस्वी झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात उत्पादन सुरू केले.

**साबण कसा बनवला जातो?**

सूपडू सांगतात, मी कडुलबाची पाने, कोरफडीचे जेल आणि ग्लिसरीन मिसळून साबण तयार करतो. यात कोणत्याही प्रकारचे रसायन नसल्यामुळे ते पूर्णपणे हर्बल आणि त्वचेला अनुकूल आहे. मुरुम आणि मुरुमांच्या समस्येत ते खूप प्रभावी ठरते. एकदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सुमारे १५ दिवस लागतात. एका बॅचमध्ये २०० ते ३०० नग साबण तयार केले जातात. बाजारात त्यांची कमत प्रति नग २० रुपये आहे.

**किती कमाई?**

शेतकरी सूपडू चौहान दरमहा ६०० ते ७०० साबण विकतात. ते घरोघरी आणि दुकानांमध्ये साबण पुरवतात आणि दरमहा चांगले उत्पन्न मिळवतात. ते म्हणतात, की शेतीतून जितका आनंद आणि समाधान मिळते तितकाच आनंद लोक म झा साबण वापरतात आणि म्हणतात, की त्याचा त्यांना फायदा झाला तेव्हा मिळतो. माझ्यासाठी ही सर्वात मोठी कमाई आहे.

**नैसर्गिक शेतीतून दुहेरी फायदा**

केळ्याच्या शेतीमध्ये सूपडू फक्त सेंद्रिय खते आणि नैसर्गिक पद्धती वापरतात. यामुळे पिकाची गुणवत्ता चांगली राहते आणि आता त्याच्या हर्बल साबण व्यवसायाने त्याची ओळख आणि उत्पन्न दोन्ही दुप्पट केले आहे.


## शेर की जुबानी

| | | |
|---|---|---|
| जिंदगी गुजर जाए पर दोस्ती कम न हो, याद हमें रखना चाहे पास हम न हो। | तारों में अकेला चांद जगम गाता है,मुश्कीलों में अकेला इन्सान डगमगाता है, कांटो से मत घबराना मेरे दोस्त, क्योंकी कांटों में भी गुलाब मुस्कुराता है। | कभी रात में तारे गिनके देख लेना, जितना तुम गिन पाए उतना तुम हमें यात करते हो, और जितने तारे बच जाए उतना हम तुमको याद करते हैं। |

## 'रेझ्युमे' अधिक चांगला कसा कराल?

सल्ला मोलाचा

'डिजिटलायझेशन'च्या युगात नोकरी शोधण्याची प्रक्रिया झपाट्याने बदलत आहे. कंपन्यांकडे आज वेळेची कमतरता असून प्रत्येक उमेदवाराचा सीव्ही सखोलपणे वाचला जात नाही. त्यामुळेच आता जुन्या पद्धतीचे रेझ्युमे चालत नाहीत. त्याऐवजी कमी पण योग्य आणि प्रभावी माहिती असलेला सीव्ही महत्त्वाचा ठरत आहे.




आजही अनेकजण आपल्या 'सीव्ही'मध्ये वैयक्तिक माहिती, जसे की वैवाहिक स्थिती, धर्म, जन्मतारीख, आई-वडिलांची नावे अशा बाबी नमूद करतात; परंतु या माहितीचा नोकरीशी थेट काही संबंध नसतो. यामुळे सीव्ही लांबतो आणि मुख्य गोष्टींचे महत्त्व कमी होते. या जागेचा वापर आपण LinkedIn प्रोफाईल, पोर्टफोलिओ लक्स, ऋळींर्कील प्रोफाईल (IT क्षेत्रासाठी) यासाठी करू शकता. मोबाइल क्रमांक आणि ई-मेल मात्र अनिवार्य असावेत. कारण हेच तुमच्याशी संपर्क ठेवण्यासाठी मुख्य साधन ठरतात.

**'ऑब्जेक्टिव्ह' ठरवा**

एक मोठी चूक अनेक उमेदवार करतात, ती म्हणजे एकच 'Career Objebtive' अनेक ठिकाणी वापरणे; मात्र प्रत्येक कंपनीची गरज, कार्यपद्धती आणि संस्कृती वेगळी असते. त्यामुळे ज्या संस्थेसाठी अर्ज करत आहात, त्यानुसार ऑब्जेक्टिव्ह ठरवणे गरजेचे आहे. यामुळे 'एचआर' ला उमेदवाराच्या गंभीरतेचा आणि नोकरीसाठीच्या तत्परतेचा अंदाज येतो. केवळ नोकरीसाठी सुसंगत अनुभवच नमूद करा.

आपल्याकडे अनेक नोकरी कवा इंटर्नशिपचा अनुभव असतो; पण त्या सर्व नोंदवणे ही चूक ठरू शकते. कारण प्रत्येक अनुभव आवश्यकच असेल असे नाही. त्याऐवजी, संबंधित जॉबच्या भूमिकेशी जुळणारेच अनुभव समाविष्ट करा. यामुळे 'एचआर'चे वाचन सुकर होते आणि 'सीव्ही' अधिक लक्षवेधी ठरतो.

**स्पर्धा आणि उपक्रम गरजेपुरतेच लिहा**

शाळेतील लहान वयातील स्पर्धा, निबंध, चित्रकला अशा गोष्टी जर नोकरीशी संबंधित नसतील, तर त्यांचा उल्लेख टाळा. त्याऐवजी, शैक्षणिक प्रगती, मिळवलेली स्कॉलरशिप, संबंधित कोर्सेसचे उल्लेख फायदेशीर ठरू शकतात.

## राजस्थानात ही ठिकाणे अवश्य पाहा...

स्टाईल स्टेटमेंट



भारतातील सर्वात रंगीबेरंगी आणि ऐतिहासिक राज्य म्हणजे राजस्थान. ते खासमखास राजवाड्यांसाठी, किल्ल्यांसाठी, वाळवंटांसाठी, तलावांसाठी आणि चैतन्यशील संस्कृतीसाठी ओळखले जाते. राजस्थानची राजधानी असलेले गुलाबी शहर जयपूर, त्याच्या ऐतिहासिक वारसा आणि शाही वैभवासाठी ओळखले जाते. येथे आमर महल, सिटी पॅलेस आणि हवा महलला भेट देणे आवश्यक आहे. जयपूरच्या रंगीबेरंगी बाजारपेठांमध्ये दागिने, बूट आणि हस्तकला खरेदी करणेदेखील आनंददायी आहे.

**※ उदयपूर लेक सिटी**

रोमँटिक ठिकाणांची आवड असेल, तर उदयपूर परिपूर्ण आहे. येथे सिटी पॅलेस, लेक पिचोला आणि सहेलियों की बारीसारखी सुंदर ठिकाणे आहेत. रात्री पिचोला लेकवर बोटग करणे हा एक संस्मरणीय अनुभव ठरतो. उदयपूर हे केवळ भारतीय पर्यटकांमध्येच नाही, तर परदेशी पर्यटकांमध्येही खूप प्रसिद्ध आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने परदेशी पर्यटक येथे भेट देण्यासाठी येतात.

**※ सोनेरी वाळूचे शहर जैसलमेर**

जैसलमेर सोनेरी वाळू आणि वाळवंट संस्कृतीसाठी प्रसिद्ध आहे. सोनार किल्ला आणि गडीसर तलाव हे येथील मुख्य आकर्षण आहेत. जैसलमेरच्या वाळवंटात सँड सर्फिंग आणि कॅम्पफायरचा आनंद घेण्यास विसरू नका.

**※ जोधपूर ब्लू सिटी**

जोधपूरचा मेहरानगड किल्ला आणि उम्मेद भवन पॅलेस पाहण्यासारखे आहेत. जोधपूरच्या रस्त्यांवर फिरताना निळ्या घरांचे सौंदर्य तुम्हाला मंत्रमुग्ध करेल. येथील स्ट्रीट फूडचादेखील आवर्जून आस्वाद घ्यायला हवा.

**※ रणथंभोर आणि सवाई माधोपूर**

निसर्गप्रेमी असाल, तर रणथंभोर राष्ट्रीय उद्यानात वाघ सफारी नक्की करा. येथे तुम्हाला वाघ, बिबटे आणि इतर वन्य प्राणी पाहायला मिळतील. प्रत्येक कोपरा तुम्हाला एक नवीन कहाणी सांगतो. कधी राजांच्या अभिमानाची आणि वैभवाची, कधी वाळवंटातील सोनेरी वाळूची आणि साहसी अनुभवाची.

राजस्थानमध्ये प्रवास करणे हे केवळ पर्यटन नाही, तर तो एक अनुभव आहे. येथील रस्त्यांवर चालताना तुम्हाला इतिहास, कला आणि लोकसंस्कृतीचे थेट प्रदर्शन पहायला मिळेल. रंगीबेरंगी बाजारपेठा, स्वादिष्ट स्ट्रीट फूड, पारंपारिक राजस्थानी पोशाख आणि संगीत इथे भुरळ घालते.

## स्मार्ट टिप्स



**'व्हॉट्स ॲप' वर नवीन वैशिष्ट्ये**

'व्हॉट्स प'मध्ये ही तीन नवीन वैशिष्ट्ये आली आहेत.

**※ शेड्यूल्ड कॉल**

आता वापरकर्ते 'व्हॉटस प' मध्ये ग्रुप कॉल शेड्यूल करू शकतात. याचा अर्थ असा, की वापरकर्ता त्याच्या कोणत्याही संपर्कांना कवा संपूर्ण गटाला व्हिडीओ कॉलसाठी आगाऊ सूचना पाठवू शकतो.

**※ इन-कॉल इंटरॅक्शन टूल्स**


दुसरे नवीन वैशिष्ट्य इन-कॉल इंटरॅक्शनबद्दल आहे. याचा अर्थ असा, की आता 'व्हॉटस प' वापरकर्ते व्हिडीओ कॉल दरम्यान प्रतिक्रिया देऊ शकतील. उदाहरणार्थ, एखाद्या वापरकर्त्याला बोलायचे असेल तर तो व्हिडीओ कॉल दरम्यान हात वर करू शकतो. त्याचप्रमाणे, तो संभाषणात व्यत्यय न आणता कॉल दरम्यान प्रतिक्रिया देऊ शकतो.

**※ नवीन कॉल व्यवस्थापन**

कंपनीने कॉल टॅबदेखील अपडेट केला आहे. आता त्यात येणाऱ्या कॉलमध्ये सहभागी होणाऱ्या लोकांची यादी आणि शेअर करण्यायोग्य कॉल लकसचे स्पष्ट दृश्य असेल. यासोबतच, जेव्हा कोणी शेअर केलेल्या लकवरून कॉल अटेंड करेल, तेव्हा कॉलरला त्याची सूचना मिळेल. ही 'व्हॉटस प'ची तयारी आहे. 'व्हॉटस प'ने वैयक्तिक आणि व्हिडीओ कॉलशी संबंधित ही महत्त्वाची वैशिष्ट्ये आणून तयारी केली आहे.

## करीअर निवडीसाठी काय कराल?

करीअरवेध




करीअरच्या प्रवासाला सुरुवात करणे हा एखाद्याच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा क्षण असतो. आज तुम्ही घेतलेले निर्णय तुमचे भविष्य घडवतील, तुमच्या आनंदावर, आर्थिक स्थिरतेवर आणि एकूण समाधानावर परिणाम करतील. उपलब्ध असंख्य शक्यता आणि मार्गांमुळे योग्य करिअर मार्ग निवडणे कठीण वाटू शकते. तथापि, एक संरचित दृष्टिकोन अवलंबून आणि विविध घटकांचा विचार करून तुम्ही आपल्या कौशल्यांना, आवडींना आणि आकांक्षांना अनुकूल असा निर्णय घेऊ शकता.

**१. स्व-मूल्यांकन:** योग्य करिअर मार्ग निवडण्याचे पहिले पाऊल म्हणजे स्वतःला समजून घेणे. तुमची ताकद, कौशल्ये, आवडी आणि मूल्यांचे मूल्यांकन करण्यासाठी वेळ काढा. तुम्ही नैसर्गिकरित्या कशात चांगले आहात, कोणत्या बाबी तुम्हाला ऊर्जा देतात याचा अंदाज घ्या. तुमचे छंद, शैक्षणिक यश आणि मित्र आणि मार्गदर्शकांकडून मिळालेल्या अभिप्रायाचा विचार करा. तुमच्यासाठी योग्य असलेले करिअर पर्याय ओळखण्यासाठी आत्म-जागरूकता ही गुरुकिल्ली आहे.

**२. संशोधन:** विविध करिअर पर्यायांचा शोध घ्या. जगात करिअरचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत, त्यापैकी बरेच तुम्हाला कदाचित माहितीही नसतील. विविध उद्योग, नोकरीच्या भूमिका आणि व्यवसायांचा शोध घ्या. त्यांच्या जबाबदाऱ्या, आवश्यक पात्रता आणि संभाव्य वाढीच्या शक्यतांबद्दल जाणून घ्या. या क्षेत्रात आधीच असलेल्या व्यावसायिकांकडून अंतर्दृष्टी मिळविण्यासाठी नोकरी मेळे, सेमिनार आणि कार्यशाळांना उपस्थित रहा. येथेच रोजगार मेळा योजना कामाला येते.

**३. नोकरी मेळावे यांचा परिचय:** रोजगार मेळा हा एक मौल्यवान उपक्रम आहे, त्याचा उद्देश म्हणजे नोकरी शोधणाऱ्यांना नियोक्त्यांशी जोडणे. हे नोकरी मेळे व्यासपीठ म्हणून काम करतात, जिथे विविध कंपन्या आणि संस्था त्यांचे काम आणि उपलब्ध पदे प्रदर्शित करण्यासाठी बूथ स्थापित करतात. नोकरी मेळाव्यात सहभागी झाल्याने संभाव्य नियोक्त्यांशी थेट संपर्क साधता येतो. त्यामुळे संवाद साधण्याची, नोकरीच्या भूमिकांबद्दल चौकशी करण्याची आणि तुमचा सीव्ही सबमिट करण्याची संधी मिळते. ही योजना नोकरी शोधणाऱ्या आणि रोजगाराच्या संधींमधील अंतर कमी करण्यासाठी पूल म्हणून काम करते.

**४. कौशल्य विकास:** संभाव्य करिअर मार्ग ओळखल्यानंतर, तुम्हाला काही कौशल्यातील तफावत जाणवू शकते. स्वतः ला अधिक आकर्षक उमेदवार बनवण्यासाठी या तफावती भरून काढणे आवश्यक आहे. आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी कार्यशाळा, अभ्यासक्रम कवा ऑनलाइन वर्गांमध्ये नावनोंदणी करण्याचा विचार करा. रोजगार मेळा योजना अनेकदा कौशल्य विकास सत्रेदेखील देतात. त्यामुळे क्षमता वाढते आणि इच्छित क्षेत्रात नोकरी मिळण्याची शक्यता वाढते.

**५. ध्येय निश्चिती:** अल्पकालीन आणि दीर्घकालीन सुस्पष्ट ध्येय तुमच्या करिअर प्रवासाला दिशा देऊ शकते. अल्पकालीन आणि दीर्घकालीन दोन्ही ध्येये निश्चित करा. पुढील काही वर्षांमध्ये तुम्ही काय साध्य करण्याचे ध्येय ठेवता? ते तुमच्या दीर्घकालीन आकांक्षांशी कसे जुळते हे बघून घ्या. स्पष्ट ध्येय असणे तुम्हाला लक्ष केंद्रित करण्यास आणि प्रेरित राहण्यास मदत करू शकते.

## टेक्नो टॉक


**'व्हॉट्स ॲप'ला इन्स्टाग्राम अकाऊंट जोडणारे फीचर**




**हे फीचर कसे काम करते?**

'मेटा'च्या अकाउंट सेंटरद्वारे इंस्टाग्राम अकाउंट लक करता येते. या फीचरमुळे वापरकर्त्यांना 'मेटा'च्या अकाउंट सेंटरद्वारे त्यांचे इंस्टाग्राम अकाउंट व्हॉट्स प्रोफाइलशी लक करण्याचा पर्याय मिळेल. 'व्हेरिफिकेशन'नंतर हे अकाउंट लक केले जाईल. एकदा पडताळणी झाल्यानंतर प्रोफाइलवर 'सोशल आयकॉन' दिसेल. यामुळे 'व्हॉट्स अप' वापरकर्त्याच्या संपर्काला हे अकाउंट खरे आहे हे कळेल. हा पर्याय आधीही होता; परंतु आधी त्यात व्हेरिफिकेशन जोडले गेले नव्हते. 'व्हॉट्स अप' वापरकर्ते त्यांच्या प्रोफाइलवर कोणतेही इंस्टाग्राम अकाउंट दाखवू शकत होते. अशा परिस्थितीत काही वापरकर्ते गोंधळले होते, की 'व्हॉट्स अप' प्रोफाइलवर दिसणारे अकाउंट खरे आहे की दुसऱ्याचे इंस्टाग्राम अकाउंट आहे. हे फीचर सर्व वापरकर्त्यांसाठी आणलेले नाही. सध्या कंपनी फक्त बीटा वापरकर्त्यांसाठी याची चाचणी घेत आहे. नंतर अभिप्रायाच्या आधारे टप्प्याटप्प्याने सर्व वापरकर्त्यांसाठी आणले जाईल. 'व्हॉट्स अप'च्या या नवीनतम वैशिष्ट्याचा लाभ घेण्यासाठी, प नियमितपणे अपडेट करत राहणे महत्त्वाचे आहे.

## टिप्स अँड ट्रिक्स




**इच्छेप्रमाणे फोटो एडिटींग करता येणार**

'गूगल'ने आपल्या गूगल फोटोज पसाठी एकदम मस्त अपडेट आणले आहे. हे फीचर फोटो प्रेमींसाठी वरदान ठरणार आहे. त्यामुळे फोटो एडिटग आता सोपे आणि मजेदार होणार आहे. या नव्या फीचरमुळे वापरकर्ते फक्त आपली इच्छा बोलून सांगून फोटो एडिट करू शकतील.

सर्वात अगोदर हे फीचर अमेरिकेतील पिक्सेल १० डिव्हाइसेसवर उपलब्ध होईल. त्यानंतर येत्या काही आठवड्यांमध्ये इतर अँड्रॉइड आणि 'आयओएस डिव्हाइसेस'वरही ते विस्तारित होईल. 'गूगल'च्या जेमिनी मॉडेल्सवर आधारित हे नवे फीचर 'गूगल फोटोज'च्या एडिटरचा भाग आहे. आता फोटो एडिट करण्यासाठी अवघड साधने शोधण्याची कवा स्लायडर्स ड करण्याची गरज नाही. हे वापरणारी व्यक्ती हवे असलेले बदल बोलून सांगू शकतात. उदाहरणार्थ 'बॅकग्राउंडच्या गाड्या काढा', 'हा जुना फोटो नवीन बनवा' कवा अगदी 'हा फोटो जरा चांगला कराफ अशा सूचना देता येतील. गूगल फोटोज त्या सूचनांचे पालन करून एडिट करेल. या फीचर्समुळे फोटो एडिटग केवळ जलदच होणार नाही, तर सर्वसामान्य वापरकर्त्यांसाठीही आणखी सोपे होईल.

## तिला गमवायचं नाही...

मॅच मेकिंग



गेल्या सहा महिन्यांपासून मी एका मुलीच्या प्रेमात आहे. तिच्या आणि माझ्या आईवडिलांना आमच्या नात्याबद्दल कल्पना आहे. पण गेल्या काही दिवसांपासून माझी मैत्रीण खूपच विचित्र वागते आहे. तिच्या आईवडिलांना आमचं हे नातं पसंत नसल्याचं तिचं म्हणणं आहे. ती याचं कारणही सांगायला तयार नाही. मी तिच्या पालकांशी बोलायला तयार आहे. पण ती याबद्दल काहीच बोलत नाही. आता मी काय करू? मला तिला गमवायचं नाही.

**उत्तर :** मित्रा, सध्या तू विचित्र परिस्थितीत अडकला आहेस. खरं तर तुझ्या मैत्रिणीने तिच्या पालकांच्या मनातलं जाणून घ्यायला हवं. त्यांच्या मनात तुझ्याबद्दल नेमकं काय आहे, न भेटताच ते तुला का नाकारत आहेत हे तिला कळायला हवं. आधी तिच्या पालकांचं म्हणणं ऐकून घ्या. मग तुम्ही दोघं बोला आणि पुढे काय करायचं हे ठरवा. तुम्ही दोघांनीही शांत रहाणं गरजेचं आहे. अजिबात गोंधळून जाऊ नका. काहीतरी मार्ग नक्कीच निघेल.

## सांभाळा शरीराचा तोल

फिटनेस फंडा



दोस्तांनो, आपल्याला आपल्या शरीराचा तोल सांभाळता आला पाहिजे. तोल सांभाळण्याचा सराव तुम्ही करू शकता. शरीराचा तोल सांभाळण्याचे लाभ जाणून घेऊ.

※ तोल सांभाळण्याच्या सरावामुळे तुमचे सांधे, स्नायू बळकट होतात. गुडघे, पायाच्या घोट्यालगतच्या स्नायूंना याचा लाभ होतो.

※ शरीराचा तोल सांभाळण्याचं तंत्र गवसल्यामुळे दुखापतीची शक्यता कमी होते.

※ शरीराचा तोल सांभाळण्याचा सराव करण्याआधी शरीराची क्षमता तपासून घ्या. यासाठी एका पायावर उभे रहा. अशा स्थितीत किती वेळ उभं रहाता येतं हे बघा. साधारण मिनिटभर या स्थितीत उभं रहाता यायला हवं.

※ तोल सांभाळण्यासाठी स्क्वॅट्स करायला सुरूवात करा. यामुळे पाय, पोटऱ्या आणि मांड्यांचे स्नायू बळकट होतील आणि एका पायावर तोल सांभाळणं शक्य होईल.

※ एका पायावर शरीराचा तोल सांभाळायचा सराव करा. स्क्वॅट्सच्या तुलनेत हा व्यायामपकार थोडा कठीण आणि गुंतागुंतीचा आहे. मात्र यामुळे तुम्हाला तोल सांभाळण्याचं तंत्र गवसेल.

※ योगासनं करताना शरीराच्या स्थितीत सतत बदल होत असतात. यामुळे शरीराचा तोल साधणं शक्य होतं. अगदी साधी योगासनं करतानाही वेगवेगळ्या स्नायूंवर ताण येतो. या सगळ्याचे लाभ शरीराला होतात.

## कॉन्सेप्ट स्टोअर सुरू करायचंय?

वेगळ्या वाटा



सध्या ऑनलाईन शॉपिंगचा बराच बोलबाला आहे. विविध ऑनलाईन साईट्स ग्राहकांवर सवलतींची खैरात करतात. मोबाईल फोनसह विविध इलेक्ट्रॉनिक वस्तू अर्ध्या किमतीत मिळतात. अशा ऑनलाईन शॉपिंग साईट्समुळे दुकानदारांपुढे बरीच आव्हानं उभी राहिली. तरुण मंडळी ऑनलाईन खरेदी करत असली तरी अनेकांना वस्तू प्रत्यक्ष बघून, स्पर्श करून खरेदी करायला आवडतं. सध्याच्या तीव्र स्पर्धेत टिकून रहाण्यासाठी दुकानदारही वेगवेगळे फंडे लढवत असतात. त्यातूनच कॉन्सेप्ट स्टोअर ही संकल्पना उदयाला आली आहे. या कॉन्सेप्ट स्टोअरच्या माध्यमातून तुम्हीही उद्योजक बनू शकता. याबाबतचं मार्गदर्शन...

कॉन्सेप्ट स्टोअर विशिष्ट संकल्पनेवर आधारित असतं. म्हणजे या स्टोअर्समध्ये ठराविक उत्पादनं विक्रीसाठी ठेवली जातात. काही दुकांनांमध्ये फक्त सौंदर्यप्रसाधनं मिळतात तर काहींमध्ये गृहोपयोगी वस्तू असतात. पुस्तकं, सजावटीच्या वस्तू अशा विविध संकल्पनांवर आधारित असणारी ही स्टोअर्स आता लोकप्रिय ठरत आहेत. ठराविक ग्राहकवर्ग समोर ठेऊन हे स्टोअर सुरू केलं जातं.

कॉन्सेप्ट स्टोअर ही संकल्पना अजूनही नवी आहे. त्यामुळे हा प्रकार लोकप्रिय होईपर्यंत थोडं थांबावं लागेल. दुसरं म्हणजे कॉन्सेप्ट स्टोअर्स नेहमीच्या दुकानांपेक्षा पूर्णपणे वेगळी असतात. ही स्टोअर्स ग्राहकांना आपल्याशी जोडून घेण्याचा पयत्न करतात. त्यांच्याशी जोडलेली रहातात. त्यामुळे कॉन्सेप्ट स्टोअर सुरू करताना ही बाब नेहमी लक्षात ठेवा.

## कोणत्या व्यक्तिमत्त्वासाठी कोणती जिन्स उपयुक्त?

स्टाईल स्टेटमेंट



जीन्स हा एक असा पोशाख आहे, जो आजकाल सर्व वयोगटातील लोकांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. ऑफिसपासून बाहेरगावी जाईपर्यंत आणि पार्ट्यांपर्यंत, पुरुष तसेच महिलांना जीन्स घालायला आवडते. ते खरेदी करणेदेखील सोपे आहे. फक्त तुमच्या आकारानुसार ऑफलाइन कवा ऑनलाइन जीन्स खरेदी करा.

जीन्सदेखील शरीराच्या प्रकारानुसार येतात. हे ऐकायला विचित्र वाटत असले, तरी हे वास्तव आहे. प्रत्यक्षात, प्रत्येकाचा शरीराचा आकार वेगळा असतो आणि त्यानुसार जीन्स निवडणे महत्त्वाचे आहे. योग्य जीन्स केवळ तुमचे व्यक्तिमत्वच वाढवत नाही, तर तुम्हाला आरामदायीदेखील बनवते.

**※ जीन्स खरेदी करण्याच्या टिप्स**

पीअर शेप बॉडीः ज्या लोकांचे शरीर नाशपातीच्या आकाराचे असते, त्यांचे नितंब जड असतात, कंबर आणि वरचे शरीर पातळ असते. अशा लोकांनी बहुतेकदा सरळ फिट जीन्स, हाय-वेस्ट जीन्स, बूटकट जीन्स घालाव्यात. अशा जीन्स नाशपातीच्या आकाराच्या लोकांवर चांगल्या दिसतात.

**※ ॲपल शेप बॉडी:** ज्या लोकांचे शरीर सफरचंदाच्या आकाराचे असते, पोट जड असते, कंबर पातळ असते अशा लोकांनी मिड-राईज जीन्स, फ्लेर्ड जीन्स, रिलॅक्स फिट जीन्स घ्याव्यात. त्या त्यांना नेहमीच चांगल्या दिसतात. म्हणून पल शेप बॉडी असलेल्या लोकांनी अशा जीन्स खरेदी कराव्यात.

**※ अवरग्लास शेप:** तुमचे शरीरही अवरग्लास शेपचे असेल, शरीर वक्र असेल, कंबर लहान असेल, कंबर आणि छाती संतुलित असेल तर स्किनी जीन्स, हाय-वेस्ट स्ट्रेच जीन्स चांगल्या दिसतात. अशा लोकांनी जीन्स हुशारीने खरेदी करावी, अन्यथा त्यांचा लूक खराब होऊ शकतो. ज्या लोकांचे शरीर आयताकृती असते, त्यांची कंबर आणि छातीचा आकार जवळजवळ समान असतो. अशा लोकांनी नेहमी लो-राईज जीन्स, डिस्ट्रेस्ड जीन्स, बॉयफ्रेंड जीन्स घालावी. या प्रकारच्या जीन्स त्यांचे सौंदर्य वाढवेल.

**※ इनव्हर्टेड ट्रॅंगल:** ज्या लोकांचे शरीर उलटे त्रिकोण असते, त्यांचे वरचे शरीर रुंद असते आणि कंबर सडपातळ असते. अशा लोकांनी नेहमी फ्लेर्ड जीन्स, रुंद पायांची जीन्स, हाय-व्हॉल्यूम जीन्स घालावीत. यामुळे त्यांचे शरीर आणखी सुंदर दिसेल.

# राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी कर्मचारी एकत्रीकरण समिती व एकता संघाचे विविध मागण्यांसाठी जिल्हा परिषद येथे १४ व्या दिवशीही बेमुदत आंदोलन सुरूच

नगर – राज्यभरातील राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी गेल्या १४ दिवसांपासून आपल्या विविध न्याय्य मागण्यांसाठी बेमुदत आंदोलन करत आहेत. शासन निर्णय जाहीर करून त्याचा शासकीय आदेश (जीआर) काढला असला तरी अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही. या अन्यायाविरोधात अहिल्यानगर जिल्हा परिषद येथे आंदोलनकर्ते कर्मचारी ठाम भूमिकेत राहून संघर्ष करत आहेत. दरम्यान, या आंदोलनाला आता अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी युनियन तसेच राज्य साखर कामगार संघटनेने जाहीर पाठिंबा दिला आहे. दहा वर्षांहून अधिक सेवा पूर्ण करूनही हक्कांचे संरक्षण होत नसल्याने नाराज कर्मचाऱ्यांनी आता एकत्र येऊन लोकशाही मार्गाने लढा उभारला आहे. एनएचएम कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून शासन दरबारी निवेदने, आंदोलनं, पाठपुरावा करत आहेत. मात्र, आजपर्यंत त्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष दिले गेलेले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी यावेळी बेमुदत संप पुकारला असून, निर्णय होईपर्यंत संप सुरू राहील, असा ठाम निर्धार त्यांनी जाहीर केला आहे. महानगरपालिका आरोग्य विभागातील कंत्राटी कामगारांनीदेखील या आंदोलनाला साथ देत काळ्या फिती लावून काम सुरू ठेवले आहे. येत्या काळात हे कामगारही पूर्ण संपावर जाणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे राज्य सरकारने तातडीने मागण्यांची पूर्तता करावी, अशी मागणी अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी युनियनचे सचिव कॉम्रेड आनंद वायकर यांनी केली.

### महानगरपालिका कर्मचारी युनियन व राज्य साखर कामगार संघटनेचा जाहीर पाठिंबा



राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी कर्मचारी एकत्रीकरण समिती व एकता संघाचे विविध मागण्यांसाठी जिल्हा परिषद येथे १४ व्या दिवशीही बेमुदत आंदोलन सुरू आहे. (छाया – लहू दळवी)

जिल्हा परिषदेत सुरू असलेल्या आंदोलनाच्या वेळी मनपा कर्मचारी युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर, बाबासाहेब मुदगल, सचिव आनंद वायकर, डॉक्टर दिलीप बागल, नंदकिशोर नेमाने, योगेश औटी यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कर्मचाऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले की, शासनाकडून आजपर्यंत सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. २० वर्षांपासून आरोग्य सुविधा पुरवूनही कर्मचाऱ्यांना ना विमा संरक्षण, ना बदली धोरण, ना पगारवाढ. अपघात विमा, आरोग्य सुविधा यांचा पूर्ण अभाव आहे. पूर्वी ५% पगारवाढ होत होती ती कमी करून केवळ ३.५% करण्यात आली. २००५ पासून सातत्याने सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायमसेवेतील समावेश करून उर्वरित मागण्या मान्य कराव्यात. नगर जिल्ह्यातील एनएचएम कर्मचारी राज्यभरात अग्रेसर कार्य करत असूनही शासनाकडून केवळ दुर्लक्ष होत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

केंद्र व राज्य सरकार कामगार कायदे मोडीत काढत असून, चांगले कायदे संपुष्टात आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. भांडवलदारांच्या फायद्यासाठी नवे कायदे आणण्याची तयारी दिसून येते. याला विरोध करण्यासाठी संघटना मजबूत असणे गरजेचे असून, एकीच्या जोरावर प्रश्न मार्गी लावता येतात. गरज पडल्यास कोर्टात जाण्याची तयारीही ठेवावी लागेल. सध्या राज्यातील ३५,००० आरोग्य कर्मचारी बेमुदत संपावर आहेत, तर अहिल्यानगर जिल्ह्यातील तब्बल १,२०० कर्मचारी आंदोलनात सहभागी असल्याची माहिती आनंद वायकर यांनी दिली.



सिव्हील हडको येथील शास्त्री चौकातील सौ. भाग्यश्री वेदकुमार कुलकर्णी यांनी महालक्ष्मीचे स्वागत करुन कृष्णजन्माचा आकर्षक देखावा तयार केला होता.

# गौरी गणपतीनिमित्त ऐतिहासिक देखावा



भिंगार – गौरी गणपतीच्या आगमना–निमित्त भिंगार येथील थोरात परिवाराने युनेस्कोने जागतिक वारसास्थळाचा दर्जा दिलेल्या मराठा साम्राज्याशी निगडीत १२ दुर्गांचा देखावा साकारून विशेष आकर्षण निर्माण केले आहे. महाराष्ट्रातील मराठा साम्राज्याशी संबंधित हे दुर्ग डोंगररांगा, समुद्रकिनारे आणि बेटांवर बांधले गेले असून मराठ्यांच्या सामरिक दृष्टिकोनाचे आणि स्थापत्यकौशल्याचे प्रतीक मानले जातात. युनेस्कोच्या मान्यतेनंतर या दुर्गांना आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष सन्मान प्राप्त झाला आहे. सल्हेर, शिवनेरी, लोहगड, राजगड, प्रतापगड, खांदेरी, रायगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि जिंजी हे किल्ले या ऐतिहासिक वारशात समाविष्ट आहेत.

थोरात परिवारातील वैष्णवी थोरात व भरत थोरात यांच्या संकल्पनेतून या देखाव्याची निर्मिती करण्यात आली. यात छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म व बालपण, अफजलखानाचा वध, पन्हाळा खिंडीत बाजी प्रभु देशपांडे यांचे पराक्रम, शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा, शिवकालीन शेतकरी जीवन, तसेच पारंपरिक खेळ अशा विविध प्रसंगांना हलत्या मूर्तींच्या साहाय्याने जिवंत रूप दिले गेले आहे.

या ऐतिहासिक देखाव्याच्या निर्मितीस दत्तात्रय थोरात, विजया थोरात, अंजली थोरात, शरद थोरात, सुवर्णा थोरात, कुणाल थोरात, सार्थक थोरात आणि श्रावणी थोरात आदींचे योगदान लाभले. गौरी गणपतीच्या निमित्ताने उभारण्यात आलेला हा देखावा स्वराज्याचा इतिहास नव्या पिढीसमोर प्रभावीपणे मांडत असून, भिंगार परिसरातील आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे.

# श्री श्रमिक बालाजी मंदिराचा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी

### जंगले शास्त्री यांचे प्रतिपादन; श्रमिकनगरमध्ये श्रमिक बालाजी मंदिरात महाप्रसाद (भंडारा)

नगर – श्री श्रमिक बालाजी मंदिराच्या वतीने सातत्याने महाप्रसाद (भंडारा) करणे ही बाब समाजासाठी प्रेरणादायी आहे. आज सार्वजनिक कार्यक्रमाचा खर्च वाढत चालला असताना असा उपक्रम करणे त्यांचा वर्धापनदिन साजरा होणे ही काळाची गरज आहे. दुसऱ्याला काहीतरी देण्याची वृत्ती यातून जोपासली जात आहे. अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. श्री श्रमिक बालाजी मंदिराचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन ज्ञानेश योग आश्रमाचे जंगलेशास्त्री यांनी केले.

सावेडीतील श्रमिकनगर येथे श्रमिक बालाजी मंदिरात नगरसेवक मनोज दुल्लम, श्री श्रमिक बालाजी अन्नदान सेवा समिती, श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्था (ट्रस्ट) यांच्या सहकार्याने दर महिन्याच्या शेवटच्या शनिवारी महाप्रसाद (भंडारा) केला जातो. त्यांचा प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ज्ञानेश योग आश्रमाचे परमपूज्य जंगलेशास्त्री यांचे हरिकीर्तन झाले. यावेळी नगरसेवक महेंद्र गंधे, नगरसेवक मनोज दुल्लम, बाबासाहेब वाकळे, विलास ताठे, करन कराळे, सोनाबाई शिंदे, विलास सग्गम, शंकर येमूल, अध्यक्ष विनोद म्याना, उपाध्यक्ष अशोक इंपलपेल्ली, राजू गडडम आदी उपस्थित होते.



श्रमिक बालाजी मंदिरात नगरसेवक मनोज दुल्लम, श्री श्रमिक बालाजी अन्नदान सेवा समिती, श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्था (ट्रस्ट) यांच्या सहकार्याने महाप्रसादाचे (भंडारा) आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ज्ञानेश योग आश्रमाचे जंगलेशास्त्री यांचे हरिकीर्तन झाले.

जंगले शास्त्री म्हणाले देवाचे नामस्मरण अखंड करत राहावे. बिड्या वळताना येथील महिला नल्ला महाराज यांचे किर्तन ऐकत असतात. त्याप्रमाणे आपल्या कानावर चांगले विचार पडले पाहिजे. देव हा फक्त भक्तिचा भुकेला आहे. दुसऱ्याला दिल्याने वाढते.

श्री श्रमिक बालाजी भगवंताची महाआरती करण्यात आली. महाप्रसादाने (भंडारा) कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी नारायण यन्नम, सागर येमूल, सचिन गरदास, नारायण कोंडम, सुनिल वराडे, नितिन गडगे, जगन्नाथ अलवाल, अंकुश गोळे, किरण शिंदे, ह.भ.प. लक्ष्मीकांत नल्ला महाराज, मिलिंद पतंगे, नरसय्या काटाबत्तीन, गणेश येमूल, ज्ञानेश्वर सुंकी, नितिन तुपे, सुनील कोडम, दत्तू अशोक कोंडा आदी भाविक उपस्थित होते.




सावेडी उपनगरात शिंदे मळा येथील काकडे परिवाराने गौरी आगमन व पूजन करून वंदना सचिन काकडे यांनी दख्खनचा राजा मंदिराची उभारणी केली तर क्रांती दिलीप काकडे यांच्या गौरी समोर आकर्षक सजावट करण्यात आली होती (छाया – विजय मते)

# लोखंडी रॉड घेवून संशयितरित्या फिरणाऱ्याला पोलिसांनी पकडले

नगर – रात्रीच्या वेळी हातात लोखंडी रॉड घेवून संशयितरित्या फिरणाऱ्या तरुणाला तोफखाना पोलिसांच्या गस्ती पथकाने पकडले आहे. २ सप्टेबर रोजी पहाटे १२.३० च्या सुमारास कोठला परिसरातील एस टी कॉलनी येथे ही कारवाई करण्यात आली. आयन शाकीर खान (वय २१, रा.मिसगर शाळेसमोर, बेलदार गल्ली) असे संशयिताचे नाव आहे. गणेशोत्सवाच्या अनुषंगाने तोफखाना पोलिस ठाण्यातील पोलिस उपनिरीक्षक अकोलकर, अंमलदार तन्वीर शेख, संदीप गिऱ्हे व होमगार्ड वेदपाठक हे कोठला, घास गल्ली, जेजे गल्ली परिसरात रात्रीची गस्त घालत असताना १२.३० च्या सुमारास एस टी कॉलनी परिसरात आयन खान हा हातात लोखंडी रॉड घेवून संशयितरित्या फिरताना आढळून आला. त्याला पोलिसांनी थांबवून विचारपूस केली असता त्याने समाधान कारक उत्तरे न दिल्याने त्याला ताब्यात घेवून त्याच्याविरुद्ध पो.ना.तन्वीर शेख यांच्या फिर्यादीवरून महाराष्ट्र पोलिस कायदा १९५१ चे कलम १२२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सावेडी सोनानगर चौक येथे उज्वला झिकरे यांच्या घरी गौरी गणपतीचे आगमन झाले. (छाया – लहू दळवी)

# उज्वला झिकरे यांच्या घरी गौरी गणपतीनिमित्त सजावट

नगर – सावेडी सोनानगर चौक येथील उज्वला झिकरे यांच्या घरी गौरी गणपतीचे आगमन उत्साहात व भक्तिभावाने झाले. घरामध्ये आकर्षक फुलांची आणि विविध लाईटिंगची सजावट करण्यात आली होती. सकाळपासूनच घरामध्ये धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. पारंपरिक पद्धतीने गौरी गणपतीची विधिवत पूजा, पंचामृत अभिषेक, आरती तसेच विविध भाज्यांचा नैवेद्य दाखविण्यात आला. या प्रसंगी हळदीकुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये परिसरातील म हिला सहभागी झाल्या. कार्यक्रमादरम्यान महिलांनी एकमेकांशी संवाद साधत परंपरा, संस्कृती आणि सामाजिक एकात्मतेचे महत्त्व अधोरेखित केले.

महाआरतीच्या वेळी घरामध्ये भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. गजर, शंखनाद आणि आरतीच्या सुरांनी संपूर्ण घर प्रफुल्लित झाले. या वेळी उज्वला झिकरे, प्रगती जिंकले, रमा झिकरे, अनुश्री झिकरे, मोनिका झिकरे आदींसह परिसरातील महिला व नागरिक उपस्थित होते. गौरी गणपतीच्या आगमनामुळे कुटुंबामध्ये आनंद, ऐक्य, आणि समृद्धीचे वातावरण निर्माण झाले असून समाजामध्ये एकत्रितपणे सण साजरे करण्याचा आदर्श उभा राहतो, असे मत यावेळी उपस्थित महिलांनी व्यक्त केले.

# सिद्धार्थनगर शॉपिंग कॉम्प्लेक्समधील गाळेधारकांना मनपाच्या जप्तीच्या नोटीसा

### तत्काळ थकबाकी जमा करा अन्यथा गाळे जप्त करणार : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

नगर – शहरातील महानगरपालिकेच्या सिद्धार्थनगर शॉपिंग कॉम्प्लेक्समधील १४ गाळेधारकांवर महानगरपालिकेने कारवाई सुरू केली आहे. गाळेधारकांकडे १२.४४ लाख रुपयांची थकबाकी असून, त्याच्या वसुलीसाठी सर्वांना जप्तीच्या नोटीसा बजावल्या आहेत. तत्काळ संपूर्ण थकबाकी न भरल्यास गाळे जप्त करून ताब्यात घेतले जातील, असा इशारा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे.

थकबाकी वसुलीसाठी महानगरपालिकेने सर्वच गाळेधारकांवर कारवाई सुरू केली आहे. सर्व थकबाकीदार गाळेधारकांना जप्ती कारवाईच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. सिद्धार्थनगर शॉपिंग कॉम्प्लेक्समधील गाळेधारकांकडे १२.४४ लाखांची थकबाकी आहे. तसेच, बहुतांश करारनामेही संपुष्टात आलेले आहेत. थकबाकीदार गाळेधारकांना वारंवार सूचना देऊनही त्यांनी थकीत भाडे न भरल्यामुळे या थकबाकीदारांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८१(ब) नुसार जप्ती कारवाईच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. थकबाकी वसुलीसाठी महानगरपालिका कठोर कारवाई सुरू करणार आहे. त्यामुळे गाळेधारकांनी थकबाकी भरून कारवाई टाळावी, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.



बुरुडगाव रोडवरील संगीता राहुल देडगावकर (सराफ) यांच्या घरचा महालक्ष्मीचा देखावा.

# ५ गावठी कट्ट्यासह तिघांना पकडले



नगर – जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने श्रीरामपूर रेल्वे उड्डाणपूला जवळ हरेगाव फाटा येथे सापळा रचून ५ गावठी कट्टे, ९ जिवंत काडतुसे व पल्सर मोटारसायकल जप्त करत ३ आरोपींना बेड्या ठोकल्या आहे. ही कारवाई २ सप्टेंबर रोजी करण्यात आली आहे. या पथकाने सापळा लावून अक्षय उर्फ भावड्या संजय माळी, (वय २३, रा. फत्तेपुर, ता. नेवासा), अजय शिवाजी मगर, (वय २५, रा. नांदुर शिखरी,ता. नेवासा), योगेश मच्छिंद्र निकम (वय ३५, रा. वडगांव गुप्ता, ता. नगर) असे पकडलेल्या संशयित आरोपींची नावे असून त्यांच्यावर श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा १९५९ कलम ३/२५, ७/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, श्रीरामपूरचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार पंकज व्यवहारे, अतुल लोटके, उमेश खेडकर, दिगंबर कारखेले, मल्लिकार्जुन बनकर, दिपक घाटकर, फुरकान शेख, प्रशांत राठोड, विशाल तनपुरे, उमाकांत गावडे यांनी केली आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांचे नगरमध्ये स्वागत

नगर – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांचे नगर जिल्हा पक्ष कार्यालय येथे आले असता त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी पक्ष कार्यालयात कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत श्रीगणेशाची आरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित जिल्हा, तालुका व शहरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची संवाद साधण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, कार्याध्यक्ष संदीप वर्पे, शहराध्यक्ष अभिषेक कळमकर, निलेश मालपाणी, अथर खान, किसनराव लोटके, अशोक बाबर, विनोद साळवे, सुवर्णा धाडगे, पुनम मुंगसे, सिताराम काकडे, प्रकाश पोटे, बाळासाहेब हराळ, अमोल जाधव,जावेद शेख, केशवराव बेरड, सुहास कासार, सतीश जामदार, गौरव नरवडे, भगवान गोरखे, अल्तमश जरीवाला, समीर पठाण, शरद पवार, नामदेव पवार, नलिनी गायकवाड आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांचे नगर जिल्हा पक्ष कार्यालय येथे आले असता त्यांचे स्वागत करण्यात आले.

प्रदेशाध्यक्ष शिंदे यांनी यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधत, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाला बळकटी देणे हीच काळाची गरज आहे. कार्यकर्त्यांच्या विश्वासावर आम्ही जनतेचे प्रश्न सोडवू व लोकाभिमुख राजकारण घडवू, असे प्रतिपादन केले.

राजेंद्र फाळके यांनी प्रदेशाध्यक्ष यांचे स्वागत करून प्रदेशाध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात संघटना बळकट करण्याचा संकल्प व्यक्त केला.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

